## प्रकरण पाचवे

## आर्य समाज आणि हैद्राबाद मुक्तीसंग्राम

## प्रकरण पाचवे

## आर्य समाज आणि हैद्राबाद मुक्ती संग्राम

भारत मातेला गुलामगिरीच्या शृंखलेतून मुक्त करण्यासाठी अनेक चळवळी व लढे लढले गेले. त्या लढयात हैद्राबाद संस्थानाचा, स्वातंत्र्य संग्राम हा एक अद्वितीय असा लढा आहे. या लढयाचे स्वरूप बरेच गुंतागुंतीचे आहे. कारण त्यात भिन्न विचारसरणीचे लोक एकाच ध्वजाखाली लढले. लोकशाहीनिष्ठ, साम्यवादी विचारांचे पुरस्कर्ते आणि रॉयीस्ट हे सर्व हैद्राबादच्या स्वातंत्र्यासाठी संघटितपणे कटिबध्द झाले होते. याशिवाय या लढयाचे वैशिष्टय म्हणजे हा संग्राम केवळ निजामाच्या जुलमी सत्तेविरूध्द नव्हता तर त्या संघर्षात मुस्लीम जातीयवादाशी देखील झुंज घ्यावी लागली.[१] हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे स्वरूप स्पष्ट करताना मराठवाडयातील ख्यातनाम विचारवंत कै.प्रा. नरहर कुरूंदकर म्हणतात, " भारताच्या इतर प्रांतातील लढयापेक्षा हैद्राबाद संस्थानातील लढयाचे स्वरूप निराळे होते. तो केवळ लोकशाही स्वातंत्र्याचा आणि जनतेच्या बाजूने संस्थानिकांच्या विरूध्दचा लढा नव्हता. त्या लढयाचा आशय कितीही शुध्द ठेवण्याचा प्रयत्न केला तरी तो मुस्लीम जातीयवादाच्या एका प्रबळकेंद्राविरूध्द चालू असणारा हिंदू प्रजेचा लढा होता ही गोष्ट नाकारता येणार नव्हती. कै. सिराजुल हुसेन तिरमीजी, हुतात्मा शोयुबल्लाखान, कोप्पल येथील चार, पाच मुस्लीम सहकारी, लढयाच्या शेवटच्या काळात लढयात सहभागी झालेले सात मुस्लीम नेते यांचे नावे कितीही उच्चरवाने घोषित केली तरी हैद्राबाद संस्थानातील संस्थान भारतातून वेगळे रहावे, स्वतंत्र रहावे या मताचा होता ही गोष्ट लपणे शक्य नव्हते."[२]

हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा इतिहास पाहत असताना आर्य समाजाने मुक्ती संग्रामात केलेले कार्य व त्याग याचा आढावा घेतल्याशिवाय तो इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. हैद्राबाद संस्थानामधील तेलंगण व कर्नाटक या प्रांतातील आर्य समाजाने

व समाजी कार्यकर्त्यांनी मुक्ती संग्रामात काय भूमिका बजावली हे जाणून घेणे अत्यंत महत्वाचे आहे. हैद्राबादच्या लढयात हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस, आर्य समाज, हिंदू महासभा इ. अनेक संघटनांनी महत्वाची कामगिरी बजावली. परंतु आर्य समाजानेच हैद्राबाद राज्यात सर्वप्रथम जनजागृती निर्माण करण्याचे कार्य केले. जेंव्हा आर्य समाजाने संघटितपणे निजामाच्या धोरणांना विरोध सुरु केला तेंव्हा निजामाने आर्य समाजाच्या धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक हक्कावर गदा आणली. इ.स. १९३० पासून आर्य समाजाचा संस्थानातील लढा अधिक तीव्र झाला.

निजाम सरकारच्या पाशवी गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी मराठवाडयातील जनतेने निकराचा लढा दिला. स्वत:च्या घरावर तुळशीपत्र ठेवून प्रसंगी लाठया व गोळया छातीवर झेलून मुक्ती संग्रामात त्यांनी लढा दिला. ही असह्य गुलामगिरी व मानवी स्वातंत्र्याची गळचेपी संपवली पाहिजे अशा इराधाने लोक स्वातंत्र्य संग्रामात उतरले होते. आपल्या धार्मिक हक्कासाठी लढा देण्याचा निर्णय आर्य समाजाने घेतला. आर्य समाजाने सरकारशी घेतलेला संघर्षाचा पवित्रा निजामाना डोकेदुखीचा वाटला म्हणून त्यांनी आर्य समाजाच्या प्रत्येक कृतीकडे डोळयात तेल घालून लक्ष दिले. परिणामत: समाजाच्या धार्मिक कार्यावर प्रतिबंध लादले गेले. शिवाय होम हवन, आखाडे, व्यायामशाळा, वाचनालये, ध्वज इ. सर्वांवर निर्बन्ध टाकण्यात आले. तेंव्हा आर्य समाजाने सार्वदेशिक आर्य प्रतिनिधीच्या मार्गदर्शनाखाली निजाम सरकार विरुध्द लढा पुकारला.

आर्य समाजाचे स्वरूप आणि कार्यपध्दती लक्षात घेऊन हजारो स्त्री-पुरुष आर्य समाजामध्ये सहभागी झाले. इतकेच नव्हे तर त्यांनी आर्य समाजाच्या तत्वाचे आचरणही केले. मराठवाडयामध्ये आर्य समाजाने विशेष जोर धरला होता. आर्य समाजाच्या हालचालीबाबत उस्मानाबाद जिल्हा आघाडीवर होता. निजामास हे संघटित कार्य न आवडल्यामुळे त्याने अनेकावर दडपण आणणे व नोटिसा बजावणे या मार्गांचा अवलंब करण्यात आला. पण लोकांनी हा दबाव पूर्णपणे झुगारून

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

लावला. हैद्राबाद राज्यात अनेक मुस्लीम जातीयवादी संघटनांनी निजामाच्या कृपाछत्राखाली धुमाकूळ घातला होता. निजामाची सत्ता दीर्घकाळ टिकावी असाच काहीसा प्रयत्न या संघटनांनी राज्यामध्ये केला. इत्तेहादूल मुसलमीन संघटना, सिद्दीक दिनदार, खाकसार पार्टी, रझाकार संघटना इ. निजाम सरकार धार्जिण्या जातीयवादी संघटनांच्या कारवाया हाणून पाडण्यामध्ये आर्य समाजाने फार मोठे यश संपादन केले. या कारवाया हाणून पाडण्यासाठी इ.स. १९३१ मध्ये आर्य प्रतिनिधी सभा ही संघटना स्थापन झाली व तेंव्हापासून निजामी जुलमास संघटित प्रतिकार करण्यास प्रारंभ करण्यात आला. तेंव्हापासून आर्य समाज व समाजी कार्यकर्ते सरकारचे शत्रू ठरले. विशेषत: हा संघर्ष शेवटचा निजाम एच.ई.एच. मीर उस्मान अली खाँ बहादूर (१९११-१९४८) यांच्या कारकीर्दीत अधिक वाढला. निजामाने आपली सत्ता ही पूर्णपणे निरंकुश मानून हिंदू प्रजेवर अन्याय करण्यास प्रारंभ केला. कासिम रझवी सारख्या माथेफिरू रझाकाराच्या वक्तव्याला तो पूर्णपणे बळी पडला. ' एका कवडीमोल किंमतीच्या माणसाने माझा व माझ्या राज्याचा नाश केला '[३] असे त्याला हताशपणे म्हणावे लागले. निजामाचे धोरण पूर्णपणे मुस्लीम धार्जिणे होते . त्यामुळे राज्यात वरचेवर हिंदू-मुस्लीम संघर्ष होऊ लागला. हा संघर्ष एका बाजूला सरकारची कृपा असणारे तर दुसऱ्या बाजूला अवकृपा असणारे यांच्यामध्ये होता. त्यामुळे हैद्राबाद राज्यात हिंदूना न्याय मिळणे अशक्य होते. तेंव्हा न्याय पदरात पाडून घेण्यासाठी हैद्राबाद राज्यात ज्या अनेक संघटना होत्या, त्यामध्ये आर्य समाज ही एक अत्यंत महत्वपूर्ण संघटना आणि चळवळ होती. आर्य समाजाने सर्वप्रथम सरकारी धोरणाविरूध्द आवाज उठवून धार्मिक सामाजिक व शैक्षणिक माध्यमातून जनजागृती घडवून आणली. हा लढा लढत असताना आर्य समाजाच्या अनेक कार्यकर्त्यांचा छळ झाला तर अनेकांना रझाकारांनी गोळ्या घातल्या. आर्य समाजाचा इतिहास हा फक्त धार्मिक व सामाजिक लढ्याचा इतिहास नसून त्याला राजकीय बाजूसुध्दा आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या अखेरच्या पर्वात आर्य समाज चळवळीने राजकीय रंग धारण करून महत्वाचे योगदान दिले.

मराठवाड्यात जेंव्हा आर्य समाजाची स्थापना झाली त्यावेळी हिंदु मुसलमान एकमेकांच्या जवळ आलेले होते असे आढळून येते. इ.स. १९१३ च्या मुस्लीम लिगच्या अधिवेशनाच्यावेळी महमद अली जिना यानी कॉंग्रेस आणि मुस्लीम लिग जवळ कसे येतील असा प्रयत्न केला. हिंदूंच्या सणात मुसलमान आणि मुसलमानांच्या सणात हिंदू आपले सर्व भेदभाव विसरून सहभागी होत असत. महमद अली जीना व शौकत अली यासारखे नेते पुण्यासारख्या ठिकाणी गणेश उत्सवामध्ये सहभागी होत. श्री. केशवराव कोरटकर यानी हैद्राबाद येथे इ.स. १८९२ मध्ये आर्य समाजाची स्थापना केली. जेंव्हा आर्य समाजाची स्थापना झाली त्यावेळी हिंदू व मुसलमान परस्परांशी अत्यंत प्रेमाने वागत होते.

आर्य समाजाने धार्मिक व राजकीय क्षेत्रात केलेल्या कार्याचा परस्पर संबंध स्पष्ट करताना प्रा. नरहर कुरूंदकर म्हणतात, " इ.स. १९३० नंतर आर्य समाजाने प्रामुख्याने राजकीय जागृतीचे कार्य केले. धार्मिक प्रचाराबरोबर राजकीय क्रांती हि फार मोठी कामगिरी आहे. त्या काळी राजकीय क्रांती, आंदोलनास बंदी होती. आर्य समाजाने धर्माची साथ घेऊन आपणाला पाहिजे असलेले राजकीय क्रांतीचे ध्येय साध्य केले. इ.स. १९३० ते १९३८ या दरम्यान धार्मिक जागृतीचे कार्य केले गेले नसते तर १९३८ नंतर झालेली राजकीय क्रांती जवळजवळ अशक्य होती असे म्हटल्यास वावगे होणार नाही."[४]

जेंव्हा आर्य समाजाने धार्मिक व्यासपीठ हेच राजकीय व राष्ट्रीय क्रांतीचे व्यासपीठ बनविण्यास प्रारंभ केला आणि समाज लोकप्रियतेच्या अतिउच्च शिखरावर पोहचू लागला तेंव्हा आर्य समाजाच्या प्रत्येक कृतीवर निजामी सत्तेची कायदेशीर बंधने पडू लागली. समाजास चोहोबाजूंनी अन्याय सहन करावा लागत होता. दैनंदिन होम हवन नाही, हवन कुंडांना परवाने नाहीत, ध्वजावर बंदी. म्हणजे जवळजवळ धार्मिक अंग संपले होते. अखेर इ.स. १९३८ मध्ये आर्य समाजाने आंदोलनाचा मार्ग स्विकारला. यालाच ` सत्याग्रह ` म्हणून संबोधण्यात येते. याच काळात आर्य समाज, हिंदू महासभा व हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस यांचे लढे चालू राहिले. हिंदू महासभेने आपला लढा मागे

तर हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने हा लढा स्थगित केला. पण आर्य समाजाने मात्र अखेर पर्यन्त लढा दिला. म्हणूनच हैद्राबादच्या मुक्ती संग्रामात आर्य समाजाचा लढा ही सिंहाची पर्वणी होती असे म्हटले जाते. हैद्राबादचे लोहपुरूष पं. नरेंद्रजी म्हणत, " आर्य समाज व्हा किंवा होऊ नका, परंतु देशाचे रक्षण करणे आमचे कर्तव्य आहे. हेच आर्यांचे आहे, हाच खरा आर्य समाज आहे. " जनतेचे खचलेले मनोधैर्य आर्य समाजाने आपल्या कार्याने पुन्हा उभा केले. निजाम सरकारच्या जुलमी व अन्यायी राजवटीला प्रतिकार करण्यासाठीच्या आर्य समाजाच्या लढयाचे प्रारंभीचे स्वरूप धार्मिक होते. आर्य समाजाने लोकांचे प्रश्न हाती घेऊन सर्वसामान्य जनतेत जागृती निर्माण केली. परिणामत: खेडयापाडयातील अनेक लोक आर्य समाजामध्ये सामील झाले. हिंदूंच्या डोळ्यांसमोर निजामाच्या सत्तांधपणामुळे अंधार निर्माण झाला होता. अशा काळात आर्य समाजाचा प्रकाश त्यांना मार्गदर्शक ठरला.

हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये मराठवाडयातील आर्य समाजाने कोणती विशेष भूमिका बजावली याची प्रस्तुत प्रकरणात चर्चा करावयाची आहे.

<u>आर्य समाजाच्या लढयाचे स्वरूप</u> :

हैद्राबाद संस्थानचा राज्यकारभार निजामाच्या व त्याच्या घराण्याच्या वर्चस्वाखाली होता. तेथे अल्पसंख्यांकाकडून बहुसंख्याकांवर अन्याय होत होता. २० व्या शतकाच्या प्रारंभी मुंबई प्रांतात राष्ट्रीय चळवळींना जोर चढला. त्याचे सादपडसाद हैद्राबाद राज्यात व पर्यायाने मराठवाडयात उमटल्या वाचून राहिले नाहीत.

हैद्राबाद संस्थानात हिंदू महासभेने आपला लढा दीर्घकाळ टिकवला नाही. इ.स. १९३८ पासून लढयाला सर्वप्रकारची नवी धार प्राप्त झाली. हिंदु महासभेचे कार्यच आर्य समाजाने पुढे आपल्या हाती घेतले. त्यामुळे हिंदू महासभेस निजाम राज्यात विशेष स्थान राहिले नाही. तर हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस ही पूर्णपणे राजकीय संघटना होती. म. गांधींच्या तत्वावर निष्ठा ठेऊन ती ब्रिटिशांविरूध्द लढा देण्याचे कार्य करत होती. हिंदू महासभेस फक्त धार्मिक स्वातंत्र्य हवे होते. मुस्लीम

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

विरोध खढ्या मर्यादित तत्वावर ती लढा देत होती. शिवाय हिंदू महासभेचे नेतृत्व हे मुंबई प्रांतातील नेत्यांच्याकडे होते. डिसेंबर १९४१ पर्यन्त हिंदू महासभेने संस्थानामध्ये आपला लढा चालू ठेवला. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस राजकीय क्षितीजावर येण्यापूर्वी आर्य समाजाने आपला लढा ख-या अर्थाने व्यापक व विशाल बनविला होता. आर्य समाजाचा लढा एका बाजूला धार्मिक स्वातं-यासाठी तर दुस-या बाजूला राजकीय स्वातं-यासाठी सुध्दा होता. मराठवाड्यात आर्य समाजाच्या भाई श्यामलाल, भाई बंसीलाल, पं. कर्मवीरजी, पं. विरभद्रजी, आर्य, पं. शेषरावजी वाघमारे, गणपतराव कथले, पं. रतनलालजी अवस्थी, श्री. दिगंबररावजी पत्तेवार, पं.डी.आर. दास, पं. बापूराव जगदाळे मास्तर इ. अनेक मान्यवरांनी लढ्याचे नेतृत्व केले. अशा लढ्यामध्ये मराठवाड्याच्या वाट्याला अनेक कठीण प्रसंग आले होते. मराठवाड्याने हैद्राबादच्या स्वातं-यापर्यन्त आपला लढा चालूच ठेवला. सीमावर्ती प्रदेशात आर्य समाजाच्यावतीने अनेक लोक लढ्यासाठी सज्ज होते. इतकेच नव्हे तर पोलिस कारवाईमध्ये त्यांनी भारतीय सैन्यास मार्ग दाखवून मुक्ती संग्रामात मोलाची कामगिरी केली. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे नेतृत्व श्री. स्वामी रामानंद तीर्थ, श्री. गोविंदभाई श्रॉफ इ. अनेक मान्यवर नेत्यांनी केले.

हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये आर्य समाजाच्या योगदानाचा विचार करीत असताना मराठवाड्यातील आर्य समाजाच्या वाट्याला निजामांच्याकडून जो अन्याय आला आणि त्याला प्रतिकार करण्यासाठी समाजाने जी भूमिका घेतली त्याचा विचार करणे अगत्याचे ठरते. इ.स. १८९२ ते १९३०, इ.स. १९३१ ते १९४१ व इ.स. १९४२ ते १९४८ अशा तीन कालखंडामध्ये आर्य समाजाच्या एकंदर राजकीय हालचालींचा आढावा घ्यावा लागतो. इ.स. १८९२ ते १९३० या कालखंडातील आर्य समाजाचा संघर्ष हा संघटनात्मक पातळीवर नव्हता. तर बराचसा वैयक्तिक पातळीवर होता. आर्य समाजाच्या आंदोलनाचा विचार करीत असताना कालाक्रमाने घडलेल्या घटनांचा सांगोपांग अभ्यास केला तर त्यातून समाजास लढा कसा द्यावा लागला हे दिसून येईल आणि मराठवाड्यातील आर्य समाजाची भूमिकाही स्पष्ट होईल.

वर उल्लेखलेल्या तीन कालखंडात मराठवाडयातील आर्य समाजाने हैद्राबादच्या मुक्ती संग्रामात केलेल्या कार्याचा सार्थत आढावा खाली घेण्यात आला आहे.

<u>पहिला टप्पा (इ.स. १८९२-१९३०)</u> :

इ.स. १८९२ मध्ये आर्य समाजाची स्थापना हैद्राबादमध्ये झाली. आर्य समाजाची हैद्राबाद राज्यातील स्थापना तेंव्हापासूनच गृहीत धरली जाते. पण तत्पुर्वी इ.स. १८९१ मध्ये मराठवाडयातील बीड जिल्हातील धारूर येथे समाजाची प्रथम स्थापना झाली होती. त्याबाबत मात्र कोठेही फारशी माहिती दिलेली आढळत नाही. आर्य समाजाच्या सुरूवातीच्या काळातील वैदिक धर्माच्या प्रचारामुळे समाजास सनातनवार्धाकडून फार मोठा विरोध झाला. आर्य समाजाच्या उत्सवा-मध्ये सुरवातीस मुसलमानही सहभागी होत असत. समाजाने दलितोध्दार व शिक्षण यासारखे कार्य हाती घेऊन लोकांचे लक्ष आर्य समाजाकडे आकर्षित करून घेतले. याबाबत मराठवाडयातील किल्ले धारूर, अंबेजोगाई, हिंगोली येथील समाजाने चांगले कार्य केले होते. त्यामुळे समाजाचा निजाम सरकारशी सुरूवातीच्या काळात कसलाही संघर्ष झाला नाही. नंतर समाजाचा वाढता जोर लक्षात घेऊन समाजास सनातनवादी व निजाम सरकार अशा दोन्ही पातळीवर विरोध सुरू झाला. इ.स. १९२९ मधील सिद्दीकी दिनदार या मुस्लीम जातीयवादी संघटनेच्या प्रचारकामुळे तर संघर्ष अटळ ठरला. पहिल्या टप्प्यातील आर्य समाजाच्या राजकीय कार्याबद्दल सूर्यनारायण रणसुभे आपल्या ग्रंथात म्हणतात, " १८९२ ते १९२९ या ३० वर्षांच्या काळात आर्य समाज राजकीय स्वातंत्र्याची भाषा जरी बोलत नव्हता तरी पण त्याच्या प्रत्येक हालचालीत स्वराज्याची भावना ओतप्रोत होती हे स्पष्ट होते."[५]

सुरूवातीच्या काळात आर्य समाजाने वैदिक कार्याचा प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यानंतर शास्त्रार्थाच्या सहाय्याने समाजाने हैद्राबाद राज्यात आपले महत्व वाढवण्यास प्रारंभ केला. समाजाच्या वार्षिकोत्सवामध्ये अनेक उपदेशकांनी

केलेली भाषणे, प्रचार यामुळे लोकांच्या मनात समाजाबद्दल एक नवी अभिरूची निर्माण झाली. मात्र जे रूढीवादी, संकुचित मनोवृत्तीचे व सनातन विचाराचे होते त्यांची आर्य समाजाबद्दलची कटुता कायमच राहिली. नबाब जाफर जंग अमीर पायगा, (हैद्राबादच्या निजामाच्या घराण्याशी संबंध असणाऱ्या जहांगीरदार घराण्यास अमीर पायगाह असे म्हणत) नबाब इमादुल्मुल्क बहादूर इ. मुस्लीम जहागिरदारानी कित्येक आर्य समाजाच्या उत्सवाचे अध्यक्षपद स्विकारले होते. यावरून सुरूवातीचा काळा हा गुण्या गोविंदाचा आणि सामंजस्याचा होता हे दिसून येते. आर्य समाजाने सुरूवातीच्या काळात मानवामानवामध्ये प्रेम आणि सहकार्याची भावना निर्माण करून हैद्राबाद राज्यात एका नव्या पर्वास प्रारंभ केला.

इ.स. १९२९ मध्ये ` सिद्दीक दिनदार ` नावाच्या मुसलमान प्रचारकाचे पितळ उघडे पाडण्याचा यशस्वी प्रयत्न पं. मंगलदेव उपदेशक यांनी केला. त्यांनी ठिकठिकाणी जाऊन सिद्दीक दीनदारचा खोटा प्रचार हाणून पाडला. यावेळी शास्त्रार्थ महारथी पं. रामचंद्रजी देहलवीजी यानी संस्थानात आर्य समाजाच्या वैदिक धर्माचा प्रचार केला.

इ.स. १९३० मध्ये श्री. मंगलदेव आणि कित्येक आर्य समाजी कार्यकर्त्यांनी राज्यामध्ये, जिल्हामध्ये व तालुक्यामध्ये आर्य समाजाच्या २५ ते ३० शाखा स्थापन केल्या. येथून पुढे आर्य समाज व निजाम सरकार यांच्यामध्ये बेबनाव निर्माण होऊन संघर्ष सुरू झाला.

<u>दुसरा टप्पा (१९३१ ते १९४१)</u> :

हैद्राबाद राज्यामध्ये आर्य समाजाच्या प्रभावी प्रचारामुळे व आंदोलनामुळे दिवसेदिवस लोकांच्या मनात नवा उत्साह निर्माण झाला. राज्यामध्ये आर्य समाजाच्या अनेक शाखा खेडोपाडी स्थापन झाल्या. पण त्याला इ.स. १९३१ पर्यन्त संघटित स्वरूप नव्हते. त्यामुळे आर्य समाजाचे कार्य हे त्या त्या शाखेपुरते मर्यादित राहिले होते. लोकांनी आर्य समाजाकडे फार मोठया कुतुहलाने आणि

विश्वासाने पाहिले. निजामाच्या राजवटीत हिंदूंच्या धर्म रक्षणासाठी प्रयत्न करणारी ही एकमेव प्रभावी संघटना लोकांच्या विश्वासास पात्र ठरली.

आर्य समाजाच्या ३६ व्या वार्षिकोत्सव प्रसंगी आर्य समाजाच्या राज्यातील अनेक शाखांचे प्रतिनिधी उपस्थित होते. तेंव्हाच समाजाचे केंद्रिय संघटन असावे असा सूर उमटला. ३७ व्या वार्षिकोत्सव प्रसंगी यावर शिक्का मोर्तब करण्यात येऊन इ.स. १९३१ मध्ये हैद्राबाद राज्यातील सर्व आर्य समाजाची मिळून " आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट " अस्तित्वात आली. येथून आर्य समाजी कार्यकर्ते व सरकार यांच्यात वारंवार संघर्ष निर्माण होऊ लागला. तत्कालिन बिदर जिल्हयातील व सध्याच्या लातूर जिल्हातील उदगीर येथील भाई पं. बंसीलाल व भाई पं. श्यामलाल या बंधूंयांनी मराठवाडयामध्ये आर्य समाजाच्या स्थापनेसाठी फार परिश्रम घेतले. त्यासाठी त्यांना ब-याच हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या.

निजाम सरकारने संस्थानातील लोकमतावरील आर्य समाजाची छाप पाहिल्यानंतर त्यांच्या धार्मिक आणि सामाजिक कार्यांस प्रतिबंध करण्यास प्रारंभ केला. पोलिसांनी आर्य समाजाच्या प्रचार यंत्रणेवर, उत्सवावर तसेच यात्रेवर प्रतिबंध घालण्यास प्रारंभ केला. तेंव्हा आर्य प्रतिनिधी सभेने ही बाब वरिष्ठांच्या निदर्शनास आणली. एवढेच नव्हे तर सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा, दिल्ली (इंटरनॅशनल आर्यन लिग) नेही याबाबतीत हैद्राबाद सरकारवर दबाव आणला. त्यामध्ये राज्यातील अन्य धर्मांबरोबरच आर्य समाजाच्या धार्मिक कार्यालाही निजाम सरकारने स्वातंत्र्य द्यावे अशी मागणी करण्यात आली. पण सरकारने याबाबतची आपली उपाययोजना अगदीच कडक केली. तेंव्हा आर्य समाजाचे एक शिष्टमंडळ दि. १२-१०-१९३२ रोजी राज्याच्या पोलिटिकल मंत्र्यांना भेटले व त्याने आपल्या पाच मागण्यांचे निवेदन दिले. या दहा सदस्यांच्या शिष्टमंडळात मराठवाडयाचे श्री.पं. नारायणरावजी वकील, मोमीनाबाद (अंबेजोगाई) हे होते. नबाब मेहदी यार जंग (सदरूल महाम सिया सियात) पोलिटिकल मंत्री यांनी यावर विश्वास दाखविणारे उत्तर आर्य समाजास दिले. पण

आर्य समाजाबाबतच्या सरकारच्या कारवाया मात्र दिवसेंदिवस वाढतच होत्या. इ.स. १९२१ च्या कायद्यानुसार नागरिक हक्क संकुचित करण्यात आले होते. तर इ.स. १९२९ मध्ये अंमलात आलेल्या गश्ती निशाण ५३ या काळ्या कायद्याने तर सर्व नागरी स्वातंत्र्यावर अक्षरश: वरवंटाच फिरवला होता.

इ.स. १९३१ ते १९४१ हा काळ आर्य समाजाच्या दृष्टीने ख-या अर्थाने बलिदानाचा आणि संघर्षाचा काळ होता. पोलिसांनी केलेल्या अत्याचाराच्या व अन्यायाच्या निषेधार्थ समाजाने २ डिसेंबर, १९३४ हा दिवस `हैद्राबाद दिवस` म्हणून साजरा करून आपला राग व्यक्त केला. पण सरकारने मात्र या गोष्टीकडे बिलकुल लक्ष दिले नाही. इ.स. १९३३ मध्ये हल्लीखेड (बिदर) येथील वार्षिकोत्सवा-मध्ये प्रक्षोभक भाषण केल्याचा आरोप ठेवून पं. रामचंद्रजी देहलवी यांच्यावर खटला दाखल करण्यात आला. परंतु त्या विरूध्द आंदोलन उभे राहिले तेव्हा सरकारने तो खटला काढून घेतला. तथापि त्यांना राज्यात प्रवेश करण्यावर मात्र बंदी घालण्यात आली. इ.स. १९३४ मध्ये सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा (इंटरनॅशनल आर्यन लिग) ने हैद्राबाद सरकारला एक मेमोरण्डम पाठवला. तेव्हा निजाम सरकारने सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेस त्याचे पुढील उत्तर पाठवले. " हैद्राबादची हुकमत आपल्या प्रजेशी नि:पक्षपातीपणे वागत आहे आणि आर्य समाजावर तर विशेष रूपाने प्रतिबंध घालण्याचा विचारही नाही."[६] हैद्राबाद राज्यातून मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटक अशा तिन्ही प्रदेशामधून सरकारने चालवलेल्या अत्याचाराच्या अनेक कागाळया आल्यानंतरच सार्वदेशिक सभेने खरी वस्तुस्थिती पाहण्यासाठी महात्मा नारायण स्वामी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली व स्वामी स्वतंत्रानंद महाराज आचार्य रामदेव इ. सदस्य असलेले एक शिष्टमंडळ निजामी राज्याच्या दौ-यावर पाठवले. त्याने संपूर्ण राज्यभर दौरे काढून आर्य समाजाचा प्रचार केला. पण पोलिसांनी त्यांना बिलकूल अडवले नाही किंवा कसलाही अडथळा निर्माण केला नाही. हा निजामाचा धूर्त डावच होता. राज्यात आम्ही सर्व धर्म प्रचारास संधी तर देतोच आहे पण त्या शिवाय अडथळेही निर्माण करीत नाही असा वरकरणी देखावा

तेंव्हा सरकारने निर्माण केला. पण शिष्टमंडळाची पाठ फिरते न फिरते तोच निजाम सरकारने पुन्हा अत्याचार व दडपशाहीस प्रारंभ केला. यावेळी निजामाचे प्रधानमंत्री म्हणून महाराजा किशन प्रसाद हे हिंदू जहागीरदार होते. ते अत्यंत धार्मिक व उदार वृत्तीचे होते. सातवा निजाम मीर उस्मान अली खॉन यास गादीवर बसवण्यामध्ये त्यांचा वाटा होता. इ.स. १९२५ ते १९३७ या काळात ते प्रधान होते. आर्य समाजी शिष्टमंडळाने हैद्राबाद राज्यातील सर्व स्थितीची त्यांना कल्पना दिली.

इ.स. १९३५ मध्ये निलंगा येथील हवन कुंडाची नासधूस करण्यात आली. शिक्षण संस्था, व्यायामशाळा, किर्तन यावरील प्रतिबंध यामुळे पुन्हा आर्य समाजी कार्यकर्त्यांवर पोलिसी अत्याचार सुरू झाला. उमरगा येथील ` सत्यार्थ प्रकाशवरील जप्ती ` इ.स. १९३७ मधील गुंजोटीच्या वेदप्रकाशचा खून, २४ इस्किन्यार १३४७ फसली अमूर निशान ३७६, हवन कुंडावरील बंदी, उदगीर व धारूर येथील दंगली, आर्य समाजावर होणारे पोलिसांचे पाशवी अत्याचार इ. अनेक घडामोडीमुळे आर्य समाजी कार्यकर्त्यांना निजाम सरकारने अक्षरश: हैराण करून सोडले. इ.स. १९३८ मध्ये दसऱ्याच्या वेळी उदगीर येथे झालेल्या दंगलीच्या संदर्भात आर्य प्रतिनिधी सभेचे उपप्रधान पं.भाई श्यामलाल व त्यांच्या २० साथीदारांना अटक करून बिदरच्या तुरूंगात ठेवण्यात आले. तेथेच भाई श्यामलाल यांचा मृत्यु झाला. हा आर्य समाजावर फार मोठा आघात होता. हैद्राबाद राज्यातील अनेक घटनांचे पडसाद इंग्लंडच्या पार्लमेंटमध्येही उमटले होते. यावरून निजाम सरकारच्या अन्याय धोरणाची प्रचिती येते. संस्थाना बाहेरील वकिलांना राज्यातील खटले चालवण्यास मज्जाव करण्यात आला होता. इ.स. १९३७ पासून आर्य समाजाने एक स्वतंत्र आंदोलन विभाग उघडून त्यासाठी निधी जमा करण्यास सुरूवात केली. १६ एप्रिल १९३८ मध्ये धळपटे दंगलीच्या बाबत खोटे आरोप ठेऊन अनेक कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली होती. तेंव्हा ही केस चालवण्यासाठी मुंबईचे सुप्रसिध्द वकील श्री. के.एफ. नरीमन यांना नियुक्त करण्यात आले. पण निजामानी त्यांचा कॉंग्रेस

विचाराशी संबंध आहे असे म्हणून त्यांच्यावर प्रवेश बंदी घातली. ही बाब प्रधानमंत्री सर अकबर हैदरी यांच्या निदर्शनास आणण्यात आली. पण काहीच उपयोग झाला नाही. यानंतर भारताचे प्रसिध्द वकील श्री. भुलाभाई देसाई यांनी काही दिवस केसही लढवली. पण तेही निराश होऊन परत गेले. तद्नंतर दिल्लीचे प्रसिध्द वकील ॲडव्होकेट बृजबिहारी तवक्कली यांना नेमण्यात आले. त्यांनी परिश्रमपूर्वक केस लढवली. पण आरोपींना होणारी शिक्षा मात्र चुकली नाही. मोहनलाल, उमराव सिंह व देविसिंह या प्रसिध्द आर्य समाजी कार्यकर्त्यांना शिक्षा झाल्या. अशा अन्यायास तोंड देणे हे आर्य समाजापुढील आव्हान ठरले.

आर्य समाजावरील वाढत्या अत्याचाराबाबत आर्य प्रतिनिधी सभा व सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा यांनी सरकारकडे बराचसा प्रयत्न केला. परंतु हे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले तेव्हा निजामाशी लढा दिला पाहिजे असा सूर बाहेर पडला. आर्य प्रतिनिधी सभेने राज्याची एकंदर सर्व स्थिती तत्कालीन प्रधान श्री. पं. विनायकरावजी विद्यालंकार यांना सांगितली. दिल्लीच्या शिरोमणी सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेचे प्रधान श्री. घनश्यामसिंह गुप्ता आणि पं. शिवचंद्रजी हे हैद्राबादला आले व त्यांनी तत्कालीन प्रधान सर अकबर हैदरी (१९३७-१९४१), पोलिस मंत्री श्री. क्राफ्टन आणि डायरेक्टर जनरल ऑफ पोलिस श्री. हॉलिन्सन यांची भेट घेतली. त्यांनी स्पष्ट केले की, आता आर्यांचा राज्याच्या पोलिस व न्याययंत्रणेवर विश्वास राहिला नाही. आता जर सरकारने आपल्या धोरणात बदल केला नाही तर यापुढील परिणामाची सर्व जबाबदारी सरकारवर राहील.[७] तद्नंतर ते दिल्लीस परतले. सार्वदेशिकच्या वतीने निजाम सरकारकडे १४ मागण्यांचा प्रस्ताव पाठवण्यात आला. परंतु सरकारने त्याला कसलेही उत्तर पाठवले नाही.

## आर्य रक्षा समितीचा सत्याग्रह :

९ आक्टोबर १९३८ रोजीसार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेने निश्चय केला की, हैद्राबाद स्टेटमध्ये वैदिक धर्मावर जी आपत्ती आली आहे त्यासाठी धर्मयुध्द केले पाहिजे. पोलिस तर आर्यांच्या विरुध्द मन मानेल तसे वागत व खटले चालवीत. दुर्दैव

असे की, न्यायालयातही खोटे आरोप रचून निकालही अयोग्य दिले जातात. त्यामुळे लोकांच्या न्यायालयावरील विश्वास उडाला आहे. या धर्मयुध्दाचे सर्वाधिकार पं.महात्मा नारायण स्वामीजींना देण्यात यावे.[८] इ.स. १९३८ मध्येच आर्य रक्षा समितीची स्थापना करून सत्याग्रहास त्यानंतर प्रारंभ करण्यात आला. निजाम राजवटीबद्दल लोकांच्या मनात तिरस्कार होता. या जुलमी राजवटीत आपल्याला संरक्षण देणारी एकमेव संस्था म्हणून लोक आर्य समाजाकडे पहात होते. इ.स.१९३० ते १९३८ पर्यन्तच्या आंदोलनाच्या मुळाशी धार्मिक अत्याचार होते. आर्य समाज प्रणीत सत्याग्रह हा धार्मिक स्वातंत्र्याचा लढा होता. त्याचबरोबर तो राजकीय स्वातंत्र्यासाठी लढा होता. इ.स. १९३८ च्या आर्य समाज सत्याग्रहाचे स्वरूप केवळ हैद्राबाद संस्थान अथवा मराठवाड्यापुरते मर्यादित राहिले नव्हते तर ते राष्ट्र व्यापक झाले होते.

सत्याग्रहाच्या मार्गाने सरकारला वठणीवर आणून आपले स्वातंत्र्य परत मिळवण्याचा आर्य समाजाने निश्चय केला. त्यासाठी आर्य समाजाने दिल्लीच्या सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेमार्फत आपल्या १४ मागण्यांचा प्रस्ताव निजाम सरकारला सादर केला. पण निजाम सरकारला मात्र त्याची कसलीही पर्वा नव्हती. आर्य समाजाने जेंव्हा आंदोलनाची ताकद उभी केली तेंव्हा मात्र हिंदूंच्या मनात नवचैतन्याची एक लहर निर्माण झाली. निजामाच्या जुलमी सत्तेमधून मुक्त होण्यासाठी त्यांनी कंबर बांधली. एवढे होऊनही सरकारने आपला जुलमी साक्या सोडला नाही. उदगीर आर्य समाजाचे नेते पं. भाई श्यामलाल व भाई बंसीलाल हे पुणे येथील हिंदू महासभेच्या अधिवेशनास गेले होते. ते परत आल्यानंतर त्यांना त्यांचे हे कार्य सरकारच्या नितीविरूध्द असून भविष्य काळात असे घडू नये अशी तंबी वजा इशारा देण्यात आला.

निजाम सरकार आता आपणास न्याय देत नाही किंवा आपली दादही घेत नाही हे आर्य समाजाच्या लक्षात आले होते. रझाकाराचा नेता कासिम रझवी हा राज्यात थैमान घालत होता. त्याच्या अत्याचाराला तोंड देण्यासाठी इ.स.१९३८

मध्ये आर्य रक्षा समिती स्थापन करण्यात आली. हैद्राबाद आर्य प्रतिनिधी सभा व सार्वदेशिक सभा यांच्या सल्ल्याने ही समिती स्थापन करण्यात आली होती.

अखेर वाढत्या जुलमाला कंटाळलेल्या आर्य समाजाने सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले व त्यानुसार आर्य रक्षा समितीने सत्याग्रहास प्रारंभ केला. मराठवाड्यातील आर्य समाजी कार्यकर्त्यांनी सत्याग्रहात मोठ्या प्रमाणात भाग घेतला होता. हैद्राबाद संस्थानातील आर्य समाजाचे, वैदिक धर्माचे रक्षण झाले पाहिजे त्यासाठी आर्य संरक्षण समितीने लढ्याचा पवित्रा घेतला. त्यानुसार सत्याग्रहाचा मार्ग अवलंबण्यात आला. केवळ समितीचे सदस्यत्व स्विकारण्याच्या आरोपाखाली श्री. बलदेवजी पतंगे आणि श्री. शंकर रेड्डी यांना एक वर्षाची शिक्षा व दंड ठोठावण्यात आला. तर हायकोर्टामध्ये मुस्लीम लिग मुर्दाबाद म्हणणाऱ्या श्री. चंद्रपाल, श्री.व्यंकटेश गुरुनाथ, श्री. प्रताप नारायण यांना कलम ६३ न्वये सहा-सहा महिन्यांची शिक्षा व ५०० रुपये दंड ठोठावण्यात आला. पुढे १३-१०-१९३८ ला पं. नरेंद्रजीनाही अटक करून मन्नानूर(हे निजाम राज्यातील काळ्यापाण्याचे ठिकाण त्यास निजाम राज्यातील 'अंदमान' असे म्हणत.) येथील तुरुंगात पाठविण्यात आले.[१] थोडक्यात आर्य समाजाची सर्वच क्षेत्रात सरकारकडून मुस्कटदाबी होऊ लागली.

हैद्राबाद राज्यातील आर्य समाजावर होणाऱ्या अत्याचारावर विचार करण्यासाठी दि. ३०-४-१९३८ रोजी भरलेल्या सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेच्या (इंटरनॅशनल आर्यन लिग) अंतरंग सभेत पं.इंद्रविद्या वाचस्पती यांनी हैद्राबाद राज्याबाबतचा एक महत्वपूर्ण प्रस्ताव मांडला. तो पुढील प्रमाणे - " यह सभा हैद्राबाद रियासतमे आर्य समाज और आर्य समाजीयों पर जो अत्याचार हो रहे है उनकी घोर निंदा करती हुई रियासत के आर्य निवासियों के साथ हार्दिक सहानुभूती प्रकट करती है । इस सभा को इस बात का विशेष दुःख है कि रियासत के उच्च अधिकारीयोंने सभा के प्रतिनिधीयोंको बार बार आश्वासन दिये कि रियासत में आर्य समाज के साथ न्यायपूर्ण व्यवहार किया जाएगा, परंतु सदा उन आश्वासनों को तोडा गया है और स्थिती को अधिक भयंकर होने दिया गया है । यह सभा

समझाती है कि अब दशा बहुत बिगड गयी है, और उसकी उपेक्षा करना असंभव है ।[१०]
या ठरावावरून हैद्राबाद राज्यांतर्गत परिस्थिती कशी होती आणि त्या परिस्थितीस आर्य समाजास न्याय मिळणे कसे कठीण होते याची कल्पना येते. अन्यायाविरूध्द प्रखर निदर्शने करण्याचा निर्णय सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेने घेतला. आर्य प्रतिनिधी सभेने सत्याग्रह प्रारंभ करण्यापूर्वी सरकारला पुन्हा समझोत्याबाबत विचारणा केली पण सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले.

<u>मराठवाडयातील स्थानिक सत्याग्रह</u> :

हैद्राबाद राज्यात स्थानिक सत्याग्रहाची सुरूवात २९ आक्टोबर १९३८ मध्ये झाली. आर्य रक्षा समितीच्या वतीने हा सत्याग्रह सुरू करण्यात आला. त्यामध्ये पं. देविलाल यांच्या नेतृत्वाखाली श्री. मुन्नालाल मिश्र, श्री. मदनमोहन, श्री. एन. देवैया, श्री. सदाशिवराव, श्री. राजैया यांनी सर्वप्रथम स्थानिक पातळीवर सत्याग्रह केला. तेंव्हा त्यांना अटक करून कलम १०७ नुसार खटला दाखल करण्यात आला. या सत्याग्रह लढयात मराठवाडयातील आर्य समाजाचा फार मोठा भरणा होता. या सत्याग्रहात श्री. निवृत्तीराव रेड्डी, वकील (अहमदपूर), पं. दत्तात्रय प्रसादजी, श्री. शेषराव वाघमारे, अॅडव्होकेट (निलंगा), श्री. दिगंबर रावजी लाटकर, अॅडव्होकेट (लातूर), श्री. दिगंबररावजी शिवणीकर (लातूर), श्री. शंकररावजी पाटील (अंधोरी), श्री. गणपतराव कथले (कळंब) इ. अनेक आर्य समाजी कार्यकर्त्यांचा समावेश होता.[११] सत्याग्रहाचे पर्व हा हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या लढयापूर्वी आर्य समाजाने केलेला फार मोठा संघटनात्मक प्रतिकार होता. आर्य संरक्षक समितीने एक गुप्त समिती स्थापन करून त्या समितीद्वारे लोकांच्यामध्ये गुप्त पध्दतीने चेतना आणि उत्साहाची भावना निर्माण केली. त्या समितीमध्ये मराठवाडयातील अॅडव्होकेट गंगारामजी व श्री. हरिश्चंद्रजी (जालना) या दोन व्यक्तींचा समावेश होता. हा गुप्त प्रयत्न करीत असतानाच पोलिसांनी श्री.हरिश्चंद्रजी (जालना) यांना अटक केली. अशा सत्याग्रहामध्ये अनेक तरूण लोक मोठया संख्येने सहभागी होण्यास कटिबध्द झाले होते.

मराठवाड्यात आर्य संरक्षक समितीने सर्वप्रथम मुखेड येथे सत्याग्रह केला. तेथील आर्य समाजी मंत्री व सहकारी यांनी सत्याग्रहाद्वारे जेल यात्रा केली. संपूर्ण राज्यभरामध्ये ७०० आर्यांनी सत्याग्रह केला तर यावेळी ४०० सत्याग्रहींना तुरूंगात टाकण्यात आले. लोकांनी तुरूंगास न भिता त्यांनी ते आपले राहण्याचे पवित्र ठिकाण आहे असे मानले. संपूर्ण राज्यात स्थानिक पातळीवर आर्य सत्याग्रहास प्रारंभ झाला होता. दरम्यान सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेचे प्रधान महात्मा नारायणस्वामी यांनी सत्याग्रहाबाबत लोकमत आजमावण्यासाठी सोलापूर येथे आर्य महासंमेलन घेण्याची इ.स. १९३८ मध्ये घोषणा केली. हैद्राबाद राज्याच्या बाबत त्यांच्याकडे सर्वाधिकार सोपवण्यात आले. तेव्हा आर्य संरक्षक समितीने हैद्राबाद सत्याग्रहाची सर्व सूत्रे सोलापूर सत्याग्रह समितीकडे सोपवली. सोलापूर येथील आर्य महासंमेलन संयोजित करण्यामध्ये हैद्राबाद आर्य सत्याग्रहाचे नेते पं. भाई बंसीलाल यांचा फार मोठा वाटा आहे.

<u>सोलापूर आर्य महासंमेलन</u> :

सोलापूर आर्य समाजाच्या प्रत्येक चळवळीचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखण्यात येत होते. आर्य महासंमेलनामुळे तर ` सोलापूर ` हे देशातील राजकीय हालचालीचे महत्वाचे केंद्र ठरले. सोलापूर येथे भरलेल्या आर्य समाज परिषदेस अध्यक्ष म्हणून लोकनायक श्री. बापूजी अणे हे होते. दि. २५ ते २७ डिसेंबर १९३८ या कालावधीत ही परिषद भरविण्यात आली. हिंदू महासभेचे बॅ. वि. दा. सावरकर हे या परिषदेस उपस्थित होते. सोलापूरच्या या परिषदेस हिंदुस्थानच्या एका टोका-पासून दुस-या टोकापर्यन्त कार्यकर्ते उपस्थित होते. निजामाच्या बेबंद कारभारावर परिषदेत टीका करण्यात आली. लोकनायक अणे यांनी आर्य बांधवांनी हिंदूंची मदत घेऊन संस्थानी सत्तेविरूध्द लढा द्यावा असे सुचवले. हा लढा केवळ धार्मिक स्वातंत्र्या-साठी नसून संस्थानातील अंतर्गत राज्यकारभाराच्या शुध्दीसाठी सुध्दा आहे असे घोषित करण्यात आले.

/

याशिवाय त्यांनी निजामाचे पंतप्रधान सर अकबर हैदरी याना आर्य समाजाच्या धार्मिक मागण्यांना मान्यता देण्यात यावी असे सुचवले होते. या आर्य संमेलनामध्ये एकूण २० प्रस्ताव पास करण्यात आले तर २२ हजार लोकांनी सत्याग्रहासाठी आपली नावे आर्य समाजाकडे दिली. या सत्याग्रहींमध्ये मराठवाड्यातील लोकांचाच भरणा होता. या संमेलनात सुमारे २५००० लोक सहभागी झाले होते. याच महासंमेलनात धार्मिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य यांचे समर्थन करणाऱ्या हिंदू महासभा, सनातन धर्म प्रतिनिधी सभा, शिरोमणी गुरुद्वार प्रबंधक कमिटी, देशी राज्य परिषद, डेमॉक्रेटिक स्वराज्य पार्टी, लिबरल पार्टी फेडरेशन, सिव्हील लिबर्टीज युनियन, काँग्रेस नॅशनालिस्ट पार्टी इ. संस्थांचे लढयासाठी सहकार्यही मागण्यात आले होते. धार्मिक स्वातंत्र्याच्या मागणीबरोबर या संमेलनामध्ये सत्याग्रहाची रूपरेषा ठरवण्यात आली. अखेर सर्व संमतीने सत्याग्रह करण्याचा महासंमेलनामध्ये निर्णय घेण्यात आला. निजामास पुन्हा एकदा आपल्या धोरणात बदल करण्याबाबत सुचविण्यात आले. संधी देण्यात आली. पण याबाबतीत त्याने कसलीही अनुकूलता दाखवली नाही. आर्य महासंमेलनासाठी महात्मा नारायण स्वामी महाराज यांनी विशेष परिश्रम घेतले होते. सत्याग्रहाचा अंतिम निर्णय या संमेलनामध्ये घेण्यात आला. अखेर राज्यात हिंदू महासभा, स्टेट काँग्रेस आणि हैद्राबाद आर्य रक्षा समिती यांनी आपला सत्याग्रह चालू केला.

आर्य समाजाने आपल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी निजाम सरकारशी केलेला जो पत्रव्यवहार होता तो सरकारच्या लाल फितीमध्येच राहिला. सरकारचे आपले एकच म्हणणे होते की, संस्थानात सर्व धर्मियांना सर्वप्रकारचे धार्मिक स्वातंत्र्य आहे. कसलाही कोणावर अन्याय होत नाही. मात्र आर्य समाजाच्या नेतृत्वाला सरकारच्या बेपर्वाई वृत्तीची पूर्णपणे कल्पना आली होती. म्हणूनच संस्थानात आर्य समाज व हिंदू यांच्यावर झालेला अन्याय ज्यांनी पाहिला त्यांच्याकडे महात्मा गांधी प्रणीत

सत्य व अहिंसेच्या मार्गाने सत्याग्रह करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. महात्मा नारायण स्वामी हेच हैद्राबादच्या सत्याग्रह लढयाचे प्रमुख सेनानी व शिल्पकार होते.

इ.स. १९३८ पासून विविध संघटनांच्या प्रभावशाली सत्याग्रहामुळे संपूर्ण हैद्राबादच्या इतिहासाला एक वेगळेच वळण लागले.

आर्य समाजाचे सत्याग्रह :

सोलापूर येथील महासंमेलनामधील सत्याग्रहाच्या निर्णयानंतर जवळजवळ एक महिना निजाम सरकारशी पत्रव्यवहाराचा घोळ चालू होता. महात्मा नारायण स्वामी महाराज यांनी सत्याग्रह टाळण्याचा बराच प्रयत्न केला. ते म्हणतात, " संमेलनातील प्रस्ताव क्र. ५ नुसार मला सर्वाधिकारी नेमले आहे. पण माझी इच्छा संघर्षाची नाही, समझोत्याची आहे. तेंव्हा आपण सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अधिकार द्यावेत. आपणास मी पाठवलेल्या प्रस्तावाचे १४ दिवसांच्या मुदतीत उत्तर पाठवावे." मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. तेंव्हा २१ जानेवारी १९३९ रोजी आर्य समाजाचे सत्याग्रहाचा निर्णय घेतला. त्यासाठी पाच कलमी कार्यक्रम आखण्यात आला. तो पुढील प्रमाणे :

" १) या दिवशी सर्व शहरे, खेडयामध्ये आर्य समाजाच्या मिरवणूका काढाव्यात.
२) ओंम ध्वज फडकावण्यात यावा. आर्य ध्वज गीत गाण्यात यावे.
३) सार्वजनिक सभांचे आयोजन करून जास्तीतजास्त आर्य व हिंदू यांचा त्यामध्ये समावेश करून घ्यावा.
४) हैद्राबाद सत्याग्रहानिमित्त आर्थिक निधीचे आवाहन करावे.
५) आर्य महासंमेलनातील प्रस्ताव ४ व ५ पास करून त्याच्या प्रती व्हॉयसरॉय व निजाम सरकार यांना पाठवाव्यात."[१२]

सत्याग्रहाचा दिवस संपूर्ण भारतामध्ये आर्य समाजाद्वारे मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सत्याग्रह संचालनासाठी एक केंद्रिय समिती स्थापन करण्यात आली. त्यामध्ये स्वामी स्वतंत्रानंदजी यांच्या शिवाय २५ सदस्यांचा समावेश होता. सोलापूर व बार्शी ही आर्य समाजाने हैद्राबाद राज्यात आपले सत्याग्रही पाठवण्याची प्रमुख ठिकाणे होती. अशा रितीने हैद्राबादमध्ये आर्य समाजाच्या सत्याग्रहाची सुरुवात झाली. " परंतु २४ डिसेंबर १९३८ च्या आतच गांधीजींनी स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह बंद करून टाकला. त्याचे प्रमुख कारण असे की, याचवेळी हिंदू महासभेने भागानगर निश:स्त्र प्रतिकार म्हणून व आर्य समाजाने धार्मिक स्वातंत्र्यासाठी सत्याग्रह सुरू केले. या दोन्ही संघटना धर्मनिष्ठ व जातीय विचारांच्या होत्या. त्यांच्या जातीय राजकारणाचा उपसर्ग कॉंग्रेसला होऊ नये व तिची लोकशाहीवादी, धर्म निरपेक्ष राष्ट्रवादी प्रतिमा मलिन होऊ नये म्हणून गांधीजींनी हा निर्णय घेतला होता."[१३]

आर्य समाजाने मात्र ठरल्याप्रमाणे आपला लढा सुरू केला. महात्मा नारायण स्वामी यांनी २२ जानेवारी १९३९ हा दिवस देशभर ' सत्याग्रह दिवस ' म्हणून साजरा करण्याची घोषणा केली.

१) पहिले सत्याग्रहाचे सर्वाधिकारी :

सत्याग्रह चळवळीचे पहिल्या पर्वात महात्मा नारायण स्वामी यांनी नेतृत्व केले. त्यांच्या नेतृत्वाखाली गुरुकुल कांगडीच्या ३५ ब्रह्मचारी विद्यार्थ्यांनी सत्याग्रह लढयात भाग घेतला होता. त्यामधील फक्त १५ विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन ते हैद्राबादला गेले. निजामी हेरांचे स्वामीजींच्या हालचालीकडे लक्ष होते. पण स्वामीजी अत्यंत चतुराईने हैद्राबादला गेले. तेथे त्यांना अटक करण्यात आली. नंतर त्यांना सोलापूरला आणून सोडण्यात आले. नंतर ४ फेब्रुवारी १९३९ ला २० सत्याग्रहींना घेऊन त्यांनी गुलबर्गा येथे सत्याग्रह केला. तेव्हा त्यांना अटक करून तुरुंगात डांबण्यात आले. यावर बॅ. वि.दा. सावरकर म्हणतात, " अगर

निजाम सरकार यह समझती है कि महात्मा नारायण स्वामी की गिरफ्तारी और सजा से हिंदू डर जायेंगे तो यह उनकी भूल है। इससे यह सत्याग्रह समाप्त नही होगा, बल्कि और भी जोर शोरसे चलेगा। आपकी गिरफ्तारी से इस आंदोलन को इतना बल मिलेगा, जितना अभी तक नही मिला।" [१४]

यानंतर सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेने नियमितपणे सत्याग्रहास प्रारंभ केला. एव्हाना निजामाची धोरणे लोकांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी सत्याग्रहाचे केंद्र एकटे हैद्राबाद शहर न करता राज्याच्या इतर शहरात व गावातही सत्याग्रह करण्यास सुरूवात केली. मराठवाडा विभागाचा त्यात सहभाग होता. आर्य समाजाच्या या सत्याग्रहासाठी आता देशाच्या विविध कानाकोपऱ्यातून सत्याग्रहींचे जथेच्या जथे येऊ लागले. जय दयानंद, जय श्रध्दानंद, वैदिक धर्माचा विजय असो. आर्य समाजाचा विजय असो, अशा घोषणांचे स्फुरण चढले होते.

२) <u>सत्याग्रहाचे दुसरे सर्वाधिकारी</u> :

महात्मा नारायण स्वामीजींच्या नंतर आर्य समाजाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व कुंवर चाँदकिरण सारडा या आर्य समाजी नेत्याने केले. अजमेरहून ते दिल्लीला गेले व तेथून मुंबईला व सोलापूरला आले. तेव्हा त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. ५ मार्च १९३८ रोजी ६४ सत्याग्रहींच्या बरोबर ते गुलबर्गा येथे पोहोचले. त्यामध्ये हैद्राबाद, वृंदावन व ज्वालापूर येथील गुरूकुलातील ब्रह्मचारीही सहभागी होते. हैद्राबाद राज्यात धार्मिक स्वतंत्रता नसल्यामुळे हा सत्याग्रह करण्यासाठी आम्ही आलो आहे असे उत्तर कुंवर चाँदकिरण सारडा यांनी गुलबर्ग्याच्या पोलिस सुपरिटेंडेंट ला दिले. गुलबर्गा येथील सत्याग्रहासाठी त्यांना १३ महिन्यांचा करावास व दंड करण्यात आला.

३) <u>सत्याग्रहाचे तिसरे सर्वाधिकारी</u> :

लाला खुशहालचंद खुरसंद (महात्मा आनंद स्वामी महाराज) यांनी दि. ६ ते २२ मार्च १९३९ या काळात सत्याग्रह केला, ते पंजाब आर्य प्रादेशिक

सभेचे प्रधान होते. त्यांनी केलेल्या प्रभावी प्रचारामुळे सत्याग्रह मोहिमेत उत्साह निर्माण झाला. १५४ सत्याग्रहींच्या बरोबर त्यांनी गुलबर्गा येथे सत्याग्रह केला. त्यांना अटक करून एक वर्ष कारावास व दंड अशी शिक्षा करण्यात आली. यावेळी आर्य समाजाचे ३५०० सत्याग्रही निजामी तुरुंगात होते.

इ.स. १९३८-३९ च्या सत्याग्रह लढयात सांगलीच्या सत्याग्रहींनीही भाग घेतला होता. त्याबाबत हिंदू महासभेचे कार्यकर्ते वासुदेव आचार्य म्हणतात, " मिरजेहून बार्शी लाइटने पंढरपूरास श्री. विठ्ठलाचे दर्शन घेऊन पुढे पंढरपूराहून सोलापूरास शिबिरात आलो. दोन दिवसांनी बारा सत्याग्रहींची तुकडी सांगलीहून आली. सोलापूरहून योग्य नेता हिंदू महासभेकडून मिळत नाही म्हणून हिंदू महासभेचे आम्ही १४ आणि आर्य समाजाचे असे एकूण १५० सत्याग्रही, आर्य समाजाचे लाला खुशालचंद यांचेसह दि. २२-३-१९३९ ला पाडव्याचे मुहूर्तावर स्टेशनवर आलो. तेथे एका दुष्ट मुसलमानाने आमच्यापैकी एकास चाकू भोसकण्याचा प्रयत्न केला, आणि त्यामुळे दंगा झाला. त्या इसमास स्टेशन बाहेर हाकलून लावण्यात आले. सात वाजले. गाडीची शिटी वाजली, सर्व सत्याग्रही गाडीत बसले. हिंदू धर्म की जय, बॅ. तात्याराव सावरकर की जय, आर्य समाज झिंदाबाद, वैदिक धर्म की जय इ. जय शब्द सुरू झाले. सोलापूरहून येणाऱ्या सत्याग्रहींना गुलबर्गा स्टेशनवर पकडून शिक्षा देऊन दुसऱ्या जेलमध्ये रवाना करण्यात येई. तर पुण्याहून येणाऱ्या सत्याग्रहींना औरंगाबादेस पकडून पुढे रवाना करण्यात येई." [१५]

४) <u>सत्याग्रहाचे चौथे सर्वाधिकारी</u> :

उत्तर प्रदेश आर्य प्रतिनिधी सभेचे प्रधान राजगुरू धुरेंद्र शास्त्री हे होते. त्यांनी ५३१ सत्याग्रहींच्या बरोबर गुलबर्गा येथे सत्याग्रह केला. त्यासाठी त्यांना २ वर्षांचा कारावास व दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आली.

चौथ्या सत्याग्रही मोहिमेनंतरच निजाम सरकारला सत्याग्रहाचे सामर्थ्य कळाले. त्यांच्या मंत्रिमंडळातील कांही सदस्यांनी सरकारने आता याबाबत कोलणी करावी, अन्यथा परिस्थिती अधिक बिघडेल असे सुचवले. तर दुसऱ्या बाजूला सत्याग्रह यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आपल्या एखाद्या चुकीमुळे सरकारला संधी मिळू नये यासाठी दक्षता घेऊन नियम ठरविण्यात आले होते. त्यानुसार सोलापूर येथून दिल्या जाणाऱ्या सूचनाप्रमाणे तसेच घोषणा, प्रमाणेच सत्याग्रहाची वाटचाल करण्यात यावी हा कटाक्ष पाळण्यात आला.

सरकारचे समझोत्याचे प्रयत्न :

आर्य समाजाच्यावतीने सुरू झालेल्या या सत्याग्रह मोहिमेस हैद्राबाद राज्यामधून आणि संपूर्ण देशभरामधून मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळू लागला. इतकेच नव्हे तर सरकारी तुरूंगही अपुरे पडतात की काय अशी शंका सरकारला येऊ लागली. सार्वदेशिक सभेने तर हा लढा प्राणपणाने लढवण्याचा निश्चय केला होता. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचे पाहून सरकारने तडजोडीचे प्रस्ताव मांडण्यास प्रारंभ केला. त्यानुसार सुपरिटेंडेंट ऑफ पोलिस मि. हॉलिन्स, नबाब बारजंग बहादूर कमिशनर, कलेक्टर श्री. रिझावी, महात्मा नारायण स्वामी, श्री. चांदकिरण सारडा व महात्मा आनंद स्वामी महाराज यांच्या सर्वांच्या चर्चेमधून होणाऱ्या तडजोडीनुसार निजाम सरकार आर्य समाजाच्या मागण्या मान्य करेल तेंव्हा सत्याग्रह पाठीमागे घेण्यात यावा, जर सर्व मागण्या मान्य होणार असतील तर सत्याग्रह पाठीमागे घेण्यात येईल असे प्रस्ताव मांडण्यात आले. त्यावर चर्चा करण्यासाठी ६ एप्रिल १९३९ रोजी श्री. वि.दा. सावरकर, लोकनायक अणे यांना गुलबर्गा येथे एकत्रित येण्याबाबत निमंत्रणे देण्यात आली. दरम्यान निजाम सरकार आर्य समाजाच्या सत्याग्रहाबाबत कसलाही समझोता करण्यास तयार नाही असे जाहीर करण्यात आले. तेंव्हा मात्र सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. याशिवाय सर्वजण सरकारच्या फसव्या प्रवृत्तीवर चिडले. इत्तेहादूल मुसलमीन संघटनेच्या दबावामुळेच निजाम सरकारने हा निर्णय घेतला होता.[१६] अखेर आर्य समाजाने

आपला सत्याग्रहाचा मार्ग पुन्हा अवलंबला व पहिल्या पेक्षाअधिक वेगाने ही सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली.

५) सत्याग्रहाचे पाचवे सर्वाधिकारी :

सुप्रसिध्द लोकसेवक आणि आर्य प्रतिनिधी सभा बिहारचे प्रधान श्री.देवव्रत वानप्रस्थी यांना मराठवाडयातील सत्याग्रह मोहिमेचे पाचवे सर्वाधिकारी नेमण्यात आले. त्यांनी १३४ सत्याग्रहींच्या बरोबर सत्याग्रह केला. दि.२२ एप्रिल ते ४ मे १९३९ या कालावधी त्यांनी सत्याग्रह केला.

लाहोर, कराची, सहारणपूर, लखनौ, याबरोबरच मराठवाडयात मोमीनाबाद, उस्मानाबाद, तुळजापूर येथून सत्याग्रहास प्रारंभ झाला. सोलापूर, बार्शी, मनमाड, नगर, पुसद, चंद्रपूर, विजयवाडा इ. सीमावर्ती भागातील ठिकाणी सत्याग्रहाची केंद्रे उभी करण्यात आली होती. निजाम सरकारने जेंव्हा शेजारील प्रांताकडे सत्याग्रहास चालना देत असल्याची तक्रार केली तेंव्हा सोलापूरचे केंद्र मनमाडला हलवण्यात आले.

इ.स. १९३९ मधील हैद्राबाद राज्यातील सत्याग्रहामध्ये जवळजवळ ७० ते ८० टक्के भरणा मराठवाडयाचा होता. मराठवाडयातील आर्य समाजी कार्यकर्त्यांनी या सत्याग्रह मोहिमेत हिरीरीने भाग घेतला. आर्य समाज, रेणापूर, जि. बिड येथील सतरा सत्याग्रहींनी गुलबर्गा व हैद्राबाद येथील सत्याग्रहामध्ये भाग घेतला.[१७] तसेच आर्य समाज, जालना येथील लक्ष्मी नारायण शास्त्री व त्यांच्या साथीदारांनी सत्याग्रहात भाग घेतला होता. इ.स. १९३९ मध्ये आर्य समाज, हिंगोली येथील श्री. भद्रसेनानी राठोड, श्री. सखारामजी डुबेवार आणि धर्मपालजी यांनी सत्याग्रहामध्ये भाग घेऊन कारावास पत्करला.[१८] गुंजोटीहून आर्य समाजाच्या ५० कार्यकर्त्यांनी सत्याग्रहात भाग घेतला. तसेच लातूर येथील आर्य समाजाच्या अनेक कार्यकर्त्यांनी सत्याग्रहामध्ये भाग घेतला होता. आर्य समाज सत्याग्रह मोहिमेमध्ये मराठवाडयाने भरीव कार्य केले. हैद्राबाद सरकारच्या गुप्त कागदपत्रांवरून व पोलिस

अह्वालावरून मराठवाडयातील परभणी, नांदेड, उदगीर, जिंतूर, बीड, उस्मानाबाद, लातूर, जालना, औरंगाबाद, कंधार, तुळजापूर, मोमीनाबाद, गुंजोटी इ. ठिकाणच्या आर्य समाजी कार्यकर्त्यांनी सत्याग्रहात भाग घेतला होता असे दिसून येते.

मराठवाडयाच्या पाचही जिल्ह्यामधून आर्य समाजाचे सत्याग्रह झाले हे यावरून स्पष्ट होते. पाचवे सर्वाधिकारी पं. वेदव्रत यांनी ५ मे १९३९ ला नांदेडला सत्याग्रह केला. तर स्वामी सुदरानंद यांनी पुसदहून आलेल्या ४६ जणांसह १४ मे १९३९ रोजी नांदेडला सत्याग्रह केला. तर पंजाबचे नारायण सेन यांना दि. ५ जून १९३९ रोजी ९ जणांसह औरंगाबादला पकडण्यात आले. त्याच दिवशी चांदा येथील आर्य समाजी शिबीरातील ६१ सत्याग्रहींनी औरंगाबादला सत्याग्रह केला.

मराठवाडयातील सत्याग्रह मोहिमेचे सहावे सर्वाधिकारी श्री. कृष्णाजी मनमाडमार्गे एका खास आगगाडीमधून औरंगाबादला उतरले. त्यांच्या सोबत प्रांतोप्रांतीचे एक हजार सत्याग्रही होते. अशाप्रकारे आर्य समाजी सत्याग्रही मराठवाडयाच्या विविध भागात सत्याग्रह करू लागले. पं. विनायकराव विद्यालंकार हे सत्याग्रह मोहिमेचे आठवे सर्वाधिकारी होते. ते २१ जुलै १९३९ ला सत्याग्रह करणार होते. दरम्यान निजाम सरकारने सुधारणा जाहीर करून आर्य समाजाच्या धार्मिक मागण्या ब-याच प्रमाणात मान्य करण्याचे ठरवले. आर्य समाजाच्यावतीने एकूण १२ हजार सत्याग्रही तुरुंगात गेले होते. त्यापैकी ५ हजार सत्याग्रही स्थानिक होते. त्यांतही मराठवाडयाचे अधिक होते. मराठवाडयाच्या तेंव्हाच्या पाच जिल्ह्यापैकी सर्वांत जास्त आर्य सत्याग्रही उस्मानाबाद जिल्ह्यातील होते.[१९] महात्मा गांधींनीही आर्य समाजाच्या सत्याग्रहाबाबत बरीच आस्था दाखवली होती. सत्याग्रहींचा तुरुंगातही मोठया प्रमाणात छळ करण्यात आला. ` रामचंद्रराव ` नावाच्या आर्य समाजी कार्यकर्त्याने ` वंदेमातरम् ` म्हणू नये म्हणून त्याच्यावर निर्बन्ध घातले. पण त्यांनी सरकारी हुकूम मानले नाहीत. तेंव्हा त्याला फटके मारण्यास प्रारंभ केला. पण अखेरच्या क्षणापर्यन्त ते ` वंदेमातरम् ` म्हणत राहिले. अखेर ते बेशुध्द होऊन पडले. त्याना पुढे ` वंदेमातरम् रामचंद्रराव ` म्हणून ओळखण्यात

येऊ लागले. यावरून तुरुंगामध्ये किती छळ असू शकेल याची कल्पना येते. हैद्राबाद राज्यातील सत्याग्रहाचे साद पडसाद ब्रिटिश पार्लमेंटमध्येही उमटले. यावरून सत्याग्रह मोहिमेची व्यापकता दिसून येते.

हैद्राबाद संस्थानातील सत्याग्रह मोहिमेबद्दल श्री. द.ग. देशपांडे आपल्या ग्रंथात म्हणतात, " संस्थानातील हिंदू जातीवरील अमानुष अत्याचारांना, छळांना, धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक स्वातंत्र्यावरील निर्बन्धाना ऐकून नि प्रत्यक्ष पाहून अ.भा.हिंदू सभेने विशेषत: अ.भा.आर्य समाजी यांनी भारतीय पातळीवर संस्थानातील हिंदूंच्या जीवित व वित्त रक्षणार्थ, हिंदू धर्माच्या रक्षणार्थ, हिंदूंच्या मूलभूत हक्क रक्षणार्थ, जो सत्याग्रह नि निशस्त्र प्रतिकार संस्थानात सुरू केला तो अपूर्व, महनिय, अजोड होता."[२०]

निजाम सरकारच्या सुधारणेच्या घोषणेवर विचार करण्यासाठी सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेच्या कार्यकारिणी बैठक दि. २४ व २५ जुलै, १९३९ मध्ये नागपूर येथे झाली. निजाम सरकारने धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक व नागरिक स्वातंत्र्याची जी घोषणा केली होती त्याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. तेंव्हा आर्य समाजातर्फे लाला देशबंधू गुप्ता यांना वाटाघाटीसाठी पाठविण्यात आले. अखेर निजाम सरकारशी झालेल्या ब-याच वाटाघाटीनंतर दि. ७ ऑगस्ट, १९३९ मध्ये आर्य समाजाने आपला सत्याग्रह स्थगित केला. तेंव्हा साडे तीन हजार सत्याग्रही निजामी तुरुंगात होते. आर्य प्रतिनिधी सभेबरोबर, सार्वदेशिक आर्य प्रतिनिधींचाही सत्याग्रह मोहिमेत सिंहाचा वाटा होता. किंबहुना सत्याग्रहाचे सर्व नियोजन त्यांनीच केले होते.

मराठवाड्यातील अनेक मान्यवर कार्यकर्त्यांनी व आर्य समाजाच्या वतीने अनेकांनी सत्याग्रहात भाग घेतला होता. सर्वांचाच येथे नामनिर्देश करणे अशक्य आहे. पण आर्य समाजी सत्याग्रहाचा उत्साह भारताच्या इतर भागापेक्षा मराठ-वाड्यात व त्याच्या सीमावर्ती भागामध्ये मोठ्या प्रमाणात होता हे हैद्राबाद मुक्ती

संग्रामाचा इतिहास वाचल्यानंतर लक्षात येते. " एकूण १०,५६६ सत्याग्रहींनी सत्याग्रहामध्ये भाग घेतला होता. त्यामध्ये ३२४६ सत्याग्रही हे निजाम राज्यामधील होते."[२१]

इ.स. १९३८-३९ मध्ये आर्य समाजाच्यावतीने निजाम सरकारच्या धोरणा-विरूध्द जो सत्याग्रह झाला त्यामध्ये मराठवाड्यातील श्री. माधवराव सदाशिवराव वय ३० वर्षे, रा. लातूर, श्री. पांडुरंग वय २२ वर्षे (उस्मानाबाद), श्री. गोविंद लक्ष्मण (नलगीर) इ. अनेक सत्याग्रहींचा तुरूंगात मृत्यू झाला.[२२] आर्य समाजाने सत्याग्रह मोहिमेमध्ये प्राणांची बाजी लावून सरकारशी संघर्ष केला व आपल्या बाजूस यश ओढून घेतले. म्हणून हैद्राबादच्या मुक्ती संग्रामात आर्य समाजाचा सत्याग्रह ही भावी हैद्राबाद राज्याच्या स्वातंत्र्याची नांदी होती असे म्हणावे लागेल. कोणी काही म्हणोत पण आर्य समाज ही एकमेव अशी संघटना होती की जीने हैद्राबाद संस्थानात फार मोठी जागृती निर्माण केली. आर्य समाजामुळेच हैद्राबाद राज्यातील व पर्यायाने मराठवाड्यातील जनतेत सामाजिक, धार्मिक, नागरिक आणि शैक्षणिक स्वातंत्र्याची संधी प्राप्त झाली. सत्याग्रह स्थगितीनंतर १९४० पासून आर्य समाजाने आपल्या रचनात्मक कार्यास प्रारंभ केला. पण १९३९ च्या समझोत्याची शाई वाळते न वाळते तोच पुन्हा निजाम सरकारने अत्याचारास प्रारंभ केला. त्यामध्ये मराठवाड्यातील आर्य समाजी यांच्या व जनतेच्या वाट्याला हा अन्याय अधिक आला.

<u>तिसरा टप्पा (१९४२ ते ४८)</u> :

<u>आर्य समाजावरील अत्याचार</u>

आर्य समाजाच्या यशामुळे शासकीय पातळीवर मुस्लीम जातीयवादी संघटनांनी व स्थानिक धर्मांध मुस्लीमांनी आर्य सामाजिक कार्यकर्त्यांचा छळ सुरू केला होता. त्यामध्ये अंधोरीचे शंकरराव पाटील व जालना येथील श्री. मांगीलाल यांना उपद्रव देण्यात आला. उमरी येथे श्री. गंगाराम व श्री. गणपतराव दत्तात्रयराव

यांना त्यांनी आर्य समाजाचा प्रचार केला म्हणून मुस्लीम गुंडांनी २३ सप्टेंबर १९४१ मध्ये ठार केले.[२३] मजलीसचे नेते बहादूर यार जंग यांनी विषारी प्रचाराने हिंदू-मुस्लीम यांच्यात विद्वेष फैलावण्याचे कार्य सुरू केले. तसेच ओऊम चा ध्वज फडकावणे व हवन कुंड स्थापन करणे याबाबत पोलिसांनी कारवाई करण्यास प्रारंभ केला. साकोल (ता. निलंगा) येथे विनापरवाना केलेली हवन कुंडाची स्थापना हे कायद्या विरूध्द आहे अशी नोटीस पाठविण्यात आली. मुसलमान गुंडांनी आता राज्यात उघडपणे गुंडगिरी, दंगे, जाळपोळ व लुटालुट करण्यास प्रारंभ केला. आर्य समाजाच्या प्रत्येक कृतीवर आता पायबंद बसू लागला. इ.स. १९४२ ते १९४८ हा काळ तर समाजाच्या दृष्टीने तीव्र संघर्षाचा काळ ठरला. यावेळी त्यांना बंडखोर म्हणून ओळखण्यात येत होते. आर्य समाजाच्या वृत्तपत्रावर कडक निर्बन्ध लादण्यात आले. उर्दू सरकारी पत्रांनी आर्य समाजावर टिकेचा भडीमार उठवला होता. इ.स. १९४२ च्या उदगीर येथील आर्य समाजाच्या परिषदेमध्ये सरकारने आपल्या धोरणात जर बदल केला नाही तर समाजाला अन्य मार्ग स्वीकारावा लागेल असा इशारा देण्यात आला. पण निजाम सरकारने त्यावर फारसा विचार केला नाही. बिदर जिल्हातील औरादशहाजनी (सध्या जि. लातूर) येथे होळीच्या दिवशी मुसलमान गुंडांनी आग व जाळपोळ करण्यास प्रारंभ केला. तेव्हा झालेल्या गोळीबारात श्री. व्यंकटराव ठार झाले. सर्वत्र हाहाकार उडाला. त्या दिवशीचा औराद-शहाजनीचा बाजार अचानकपणे बंद पडला. हिंदूंच्या घरांना व दुकानांना आगी लावण्यात आल्या. या भयानक परिस्थितीची पाहणी करण्याकरिता श्री. स्वामी रामानंदतीर्थ व ॲडव्होकेट शेषरावजी वाघमारे तेथे गेले. संकटग्रस्तांना आर्य समाजाने मदतीचा हात दिला. म. गांधीनी रू. ५००-०० चे सहाय्य यावेळी पाठवून दिले. सरकारने श्री. विरभद्रजी आर्य (देशबंधू) श्री. निवासराव व श्री. तुळजाराम यांच्यावर खटले दाखल केले.[२४] त्यांना शिक्षाही ठोठावण्यात आली. हा खटला गुलबर्गा येथील कोर्टात चालवला होता. पण शांतता राखण्याच्या दृष्टीने तत्कालीन प्रधानमंत्री सर मिर्झा इस्माईल यांनी त्यांना (आर्यसमाजी नेत्यांना) कारावासातून मुक्त केले.

आर्य समाजाच्या वाटयाला जणू काही शिक्षा, जाळपोळ, खून, खटले, दहशत हेच सर्व काही आले होते. कासिम रझवी हा आता रझाकाराच्या संघटनेचा प्रमुख झाला होता. बहादूर यार जंग नंतर त्यानेच मजलिस इत्तेहादूलची सर्व सूत्रे स्विकारली होती. मुस्लीम स्वयंसेवक संघटनेत हजारो मुसलमान तरूणांना भरती करून घेऊन त्यांना शस्त्रात्रे देऊन हिंदूंच्या व आर्यांच्या विरूध्द लढण्यास तयार केले होते. रझाकाराच्या कारवायामुळे संपूर्ण राज्यात एकच दहशत निर्माण झाली होती, लोक हवालदिल झाले होते. अशावेळी लोकांच्यामध्ये मनोधैर्य निर्माण करण्याचे काम भाई बंसीलाल, शेषरावजी, गोपाळदेव शास्त्री इ. अनेक आर्य समाजाच्या अनेक कार्यकर्त्यांनी केले. ' जेंव्हा गावावर इत्तेहादूल मुसलमीन संघटनेचा अथवा रझाकारांचा हल्ला होत असे तेंव्हा आर्य समाजाच्या मंदिरात इशारा देण्यासाठी मोठया घंटा बसवण्यात आल्या होत्या. त्या घंटा वाजू लागल्या की हिंदू आर्य समाज मंदिराजवळ जमत व रझाकारांना प्रतिकार करीत. आर्य समाजाने हा हिंदूंच्यामध्ये संघटितपणा टिकवला होता.'[२५] जर आर्य समाजाचे आंदोलन झाले नसते तर मराठवाडयात एकही हिंदू, हिंदू म्हणून जगू शकला नसता. पशु-पेक्षाही त्यांची दयनीय अवस्था झाली असती. केवळ आर्य समाजामुळेच हिंदू समाजाचे रक्षण झाले.[२६]

आर्य समाजास मुसलमानांच्या वाढत्या कारवायांना वारंवार तोंड द्यावे लागत होते. आर्य समाजी दिसला किंवा त्यांच्या काही हालचाली आढळून आल्या तर निजामाचे पोलिस त्याच्या मागावर असत. त्यामुळे आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांवर तुरूंग व जाळपोळ यासारखे अनेक प्रसंग येत. सरकारच्या जप्तीच्या धोरणामुळे समाजाची बरीचशी कागदपत्रे काळाच्या ओघात नष्ट केली गेली. सालार-ए-आझम कासिम रझवी यांने तर संपूर्ण राज्यात धुमाकूळ घातला होता. ३१ मार्च, १९४८ मध्ये ' हैद्राबाद शस्त्र सप्ताह ' साजरा करण्यात आला तेंव्हा तो म्हणतो, ' हैद्राबाद के मुसलमान तब तक अपनी तलवार को म्यानमें नही रखेंगे जब तक की इस्लाम के प्रभुत्व के उद्देश की पूर्ती नही होती, एक हाथमें कुराण तथा दुसरे हाथमें

तलवार लेकर शत्रूपर टूट पडो । यह स्मरण रखो कि भारत के साडे चार करोड मुसलमान हमारे पाचवे कलम का काम करेंगे ।[२७] अशा वल्गनानी त्याने राज्यात घबराटीचे वातावरण निर्माण केले होते. निजाम मीर उस्मान अली खान हा मात्र पूर्णपणे कासिम रझवीच्या अंकीत होता.

त्यामुळे राज्यात स्वैराचार माजला होता. आर्य समाजाने इतर संघटनां-पेक्षा अधिक प्रतिकार केल्यामुळे त्यांच्यावर अधिक वक्रदृष्टी होती. आर्य समाज हिंगोलीचे एक कार्यकर्ते श्री. गंगावीर यांच्यावर मुस्लीम गुंडांनी हल्ला केला. तेंव्हा हल्लेखारांना पकडण्याऐवजी सहा आर्य समाजी यांच्यावर आरोप ठेवण्यात आले.

<u>आर्य समाजावरील पोलिसी अत्याचार</u> :

निजामाच्या पोलिसांनी आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांचा अतोनात छळ केला. त्यामध्ये मराठवाड्यातील अनेक कार्यकर्त्यांना मोठया प्रमाणात छळ सहन करावा लागला. आर्य समाजाचे कार्यकर्ते श्री. गणपतलाल (मार्डी) यांच्या विरुध्द कलम (धारा) १०४ (ताजीरात आसफिया) नुसार कारवाई करुन त्यांना तीन महिन्याची शिक्षा दिली.[२८] अंकोलगा (जि. बिदर-सध्या ता. निलंगा, जि. लातूर) येथील श्री. माधवरावजी हे ' सत्यार्थ प्रकाश ' वाचतात म्हणून त्यांची हत्या करण्यात आली.[२९] तावसी, जि. उस्मानाबाद (लोहारा पायगा) येथे इ.स. १९३२ मध्ये मुसलमानानी हिंदू मंदिर पाडून मसजिद बांधण्याचा उद्योग आरंभला. तेंव्हा श्री.रामा मांग याने त्याला विरोध केला. म्हणून त्यास ठार मारण्यात आले.[३०] गुंजोटीमध्ये श्री. वेदप्रकाश आर्य मुसलमान धर्म स्विकारत नाही म्हणून अब्दुलकादर, शम्म, हुसेन खाँ, चांद, मुन्वर तथा लाडले साहेब इ. नी इ.स. १९३९ मध्ये वेदप्रकाश आर्य यांचा खून केला. वेदप्रकाश हा आर्य समाजाचा पहिला हुतात्मा मानला जातो. नळदुर्ग मध्ये ३० आर्य समाजी कार्यकर्त्यांच्या विरुध्द कलम १०४ नुसार खटला चालवण्यात आला. त्यामध्ये ७० वर्षांपासून १३ वर्षांपर्यन्तच्या अबालवृध्दांचा समावेश होता. मुस्लम

(गुंजोटी पायगा) येथील १३ आर्य समाजी कार्यकर्त्यांना विनाकारण तुरुंगात डांबण्यात आले होते. तर हवन कुंड स्थापन करण्याच्या कारणावरून मुखेड येथील चौधरी श्रीराम यांना शिक्षा ठोठावण्यात आली. तर साकोल (जि. बिदर सध्या लातूर) येथील २० आर्य समाजी कार्यकर्त्यांवर मसजिदीच्या पुढे वाद्ये वाजवली म्हणून खटला दाखल करण्यात आला. तसेच लातूर येथे इ.स. १९३७ मध्ये भाद्रपद महिन्यात भगवान महावीराच्या मूर्तीची मिरवणूक काढण्याचे जैन बांधवांनी ठरवले होते. पण त्यास मनाई करण्याचे प्रयत्न स्थानिक मुसलमान गुंडांनी सुरू केले. जर मिरवणूक निघाली तर याद राखा अशी तंबीही देण्यात आली. तेंव्हा आर्य समाजाचे नेते भाई पं. बंसीलाल यांची मदत घेण्याचे जैन बांधवांनी ठरवले व त्याप्रमाणे त्यांच्या मदतीने मिरवणूक निघाली. तेंव्हा भाई बंसीलाल म्हणाले, " आर्य समाज मूर्तिपूजक नही हैं, तो मूर्तिभंजक भी नही है। आर्य समाज अस्तिकोंका रक्षक है। सनातनधर्मी बहन ने आर्य समाज रूपी भाई को जब भी राखी बांधी तो भाई उसका रक्षा करने सदैव तयार रहा है।"[३१] मिरवणूक ठरल्याप्रमाणे निघाली. पण मध्यंतरीच बंदी हुकूम निघाला. मिरवणूक चालूच राहिली तेंव्हा पोलिस सर्कल इन्स्पेक्टर महमंद आजम यांने हवेत गोळीबार केला. यावेळी १०० आर्य समाजी कार्यकर्त्यांना विनाकारण अटक करण्यात आली. लातूरच्या या घटनेवरून आर्य समाजाची उपयुक्तता स्पष्ट होते. १८ जून १९३७ मध्ये पोलिस इन्स्पेक्टर, औसा, जि. उस्मानाबाद यांनी नागरसोगा येथील श्री. रघुनाथ प्रसाद व घनश्याम प्रसाद यांना आपण जर विनापरवाना हवन कुंड बांधले तर कायद्यानुसार कार्यवाही करण्यात येईल असा इशारा दिला. तळेगाव (अहामदपूर, जि. बिदर) येथील श्री. बाबूराव नावाच्या २० वर्षे वयाच्या इसमाला मुसलमान गुंडांनी लंगडे करून टाकले. अशा एक ना अनेक आर्य समाजी कार्यकर्त्यांच्या नशीबी या प्रकारचा छळ आलेला होता. तरीही इ.स. १९४६ मध्ये कोळी, ता. हदगांव, जि.नांदेड येथील दौलत नावाच्या रझाकार गुंडा विरुध्द दगडूजी पुंजाजी (२५ वर्षे) व भगवान पुंजाजी (२० वर्षे) या आर्य समाजींनी आवाज उठविला.[३२] आर्य समाजाने हैद्राबाद राज्यात केलेल्या संघर्षाबद्दल

पं. नरेंद्रजी म्हणतात, " हैद्राबाद के आर्य समाजियों की साधना और संघर्ष का यह ज्वलंत इतिहास भावी युग के लिए परम प्रेरणादायक है। शहीदों के रक्त का एक-एक बिंदु आज आर्य समाज के माथे का चंदन और भारत माँ के भाग्य का तिलक बनकर चमक रहा है।"[३३]

मराठवाड्यातील अनेक आर्य समाजीयांनी निजामाच्या विरोधी लढ्यात आपले प्राण गमावले. अखेर त्यांच्याबद्दल म्हणावे लागते, " किती उधळावे मुक्या मनाने शब्दांचे बुडबुडे। तुझे पोवाडे गातील पुढती तोफांचे चौघडे ।।

<u>मुक्ती संग्रामाचे अखेरचे पर्व</u> :

ब्रिटिशांच्या विरुद्ध म. गांधीजींच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानमध्ये लढा चालू होता. तेंव्हा हैद्राबाद राज्यातही आर्य समाजाच्यावतीने निजामाच्या जुलमी सत्तेविरुद्ध संघटनात्मक पातळीवर विरोध करण्याचे कार्य चालू होते. इ.स. १९४६ मध्ये हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठवण्यात आली. निजामाने सर्वच संघटनांची मुस्कटदाबी करून आपल्या हुकूमशाही प्रवृत्तीचे सर्वांना दर्शन घडवले होते. इ.स.१९४७ पासून तर अनेक कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबणे, संघटनावर बंदी घालणे, दंगेधोपे माजवणे, दहशत बसवणे, कार्यकर्त्यांचा व जनतेचा छळ करणे इ. अवैध मार्गांचा अवलंब करून राज्यात आमचीच हुकमत सर्वश्रेष्ठ असून आम्हीच येथे राज्य करणार आहोत असे दाखविण्यास निजामाने सुरवात केली. आर्य समाजाने यावेळी लोकांना संघटित होऊन निजामी जुलमाचा प्रतिकार करण्याची फार मोठी प्रेरणा दिली. १५ ऑगस्ट १९४७ मध्ये ब्रिटिशांच्या गुलामगिरीमधून भारतास स्वातंत्र्य मिळाले. पण दुसऱ्या बाजूला हैद्राबाद राज्य मात्र स्वातंत्र्यापासून वंचित राहिले. संस्थानात अंध:कारमय वातावरण निर्माण झाले.

अशा संकटमय स्थितीत सातारा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनीही हैद्राबाद मुक्ती संग्रामात कार्य केले आहे. त्याबाबत स्वातंत्र्यसैनिक जी.डी.लाड म्हणतात,

" मराठवाड्या भोवती शेगाव, पिंपरी, उमरखेड, बार्शी, येथे सैनिक शिबीरे सुरु झाली. साता-यातून आणलेले कॅप्टन आकाराम आदी सहाजण लढाईचे शिक्षण देत राहिले. महादेव भिरजे, श्रीधर चिप्रीकर, बाळकृष्ण माळी, बाळ जोशी, आनंदा नलवडे, बाळकृष्ण जाधव आदि कार्यकर्ते शिबीरावर दाखल झाले. साता-यातील सारी हत्यारे आम्ही त्या शिबीरावर आणली. स्थानिक लढवय्ये साथीला घेऊन रझाकारांच्या तळावर हल्ले सुरु केले. "[३४]

कासिम रझवीने रझाकारांची संघटना बळकट करण्यासाठी मुसलमान तरुणांची जादा भरती सुरु केली. हैद्राबाद एक स्वतंत्र राज्य म्हणून नव्हे तर ते एक स्वतंत्र इस्लामी राष्ट्र म्हणून रहावे यासाठी त्याने प्रयत्न सुरु केले. भारतीय स्वातंत्र्यासंबंधीच्या ब्रिटिश सरकारच्या ३ जून, १९४७ च्या घोषणेनंतर ११ जून, १९४७ ला काढलेल्या फर्मानात १५ ऑगस्ट, १९४७ नंतर मी स्वतंत्र राहीन असे निजामाने जाहीर केले. ११ जुलै, १९४७ ला हैद्राबाद राज्याचे प्रधान छतारीचे नबाब आपल्या शिष्टमंडळासन लॉर्ड माऊंटबॅटन यांना भेटले. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर जो ' जैसे थे ' करार करावयाचा त्यासंबंधी वाटाघाटी करणारी समिती हैद्राबाद, हिंदुस्थान व पाकिस्तान या तीन राष्ट्रांची असावी असा नबाब साहेबांनी आग्रह धरला. निजाम जैसे थे कराराचा घोळ दीर्घकाळ व हेतूपूर्वक घातला. तर या कालावधीत छतारीच्या नबाबाना मात्र मानहानी पत्करुन हैद्राबाद सोडावे लागले. मीर लायक अली हे प्रधान पदावर असताना २९ नोव्हेंबर १९४७ रोजी एक वर्षासाठी जैसे थे करार झाला. तेंव्हा स्वातंत्र्यासाठी फुंकलेले रणशिंग १७ सप्टेंबर १९४८ या दिवशी निजामाच्या शरणागतीनेच बंद करण्यात आले.

हैद्राबादच्या या संग्रामात दयानंद कॉलेज, सोलापूर यांनी फार मोठा वाटा उचललेला होता. त्यांनी ' आधी स्वराज्य आणि मग शिक्षण ' ही घोषणा केली होती.[३५] वंदेमातरम् सत्याग्रहामध्येसुध्दा येथील विद्यार्थ्यांनी फार मोठ्या प्रमाणात भाग घेतला होता. रझाकारांच्या अत्याचाराला कंटाळून अनेक हिंदू हैद्राबाद राज्यातून निर्वासित होऊन बाहेर पडले. त्यांची व्यवस्था लावण्या-

साठी मराठवाड्यातील आर्य समाजी कार्यकर्त्यांनी सीमावर्ती भागात ठिकठिकाणी निर्वासीत कँप उघडले. निजामाने दुसऱ्या बाजूला विशाल साम्राज्याची स्वप्ने पाहण्याचा प्रयत्न सुरू केला त्यानुसार युनोचे सदस्यत्व मिळवण्यासाठी त्याने धडपड सुरू केली.

आर्य समाजाने अशाही स्थितीत आपला लढा चालूच ठेवला. स्वामी रामानंद तीर्थ यांनीही आर्य समाजाच्या कार्याची प्रशंसा केली. इ.स. १९४७-४८ मध्ये निजामाच्या वाढत्या अत्याचारास प्रतिकार करणाऱ्या संघटनांना आर्य समाजाने सहाय्य करावे असा आर्य प्रतिनिधी सभेने आदेश दिला. आर्य समाजाच्या या निर्णयामुळे स्टेट काँग्रेसला अनेक लोक मिळाले. जे कालपर्यंन्त आर्य समाजाच्या झेंड्याखाली लढत होते ते आता स्टेट काँग्रेसच्या बाजूस वळले. एकूण लढ्यास विशाल स्वरूप प्राप्त झाले. हैद्राबादच्या या संग्रामाबाबत देशभर चर्चा चालू झाली. अखेर सरदार वल्लभभाई पटेलांच्या निर्णयाने हैद्राबाद राज्यात पोलिस कारवाई करून ते संस्थान भारतीय संघराज्यात सामील करून घेतले व निजामाची स्वातंत्र्याची सर्व दिवा स्वप्ने धुळीस मिळाली. ही दिवास्वप्ने धुळीस मिळवण्यामध्ये मराठवाड्यातील आर्य समाज कार्यकर्त्यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. भारतीय सैनेला संस्थानामध्ये मार्गदर्शन करण्यात आर्य समाज आघाडीवर राहिला. उस्मानाबादच्या सीमारेषेवर आर्य समाजाचे शेषराव वाघमारे (निलंगा), श्री. रामचंद्रराव (लातूर) श्री.गोविंद नाईक (निलंगा) यांनी ते काम केले. * निलंग्याचे शेषराव वाघमारे आणि गोविंदराव नाईक व रामचंद्रराव लातूरकर यांनी उस्मानाबादच्या हद्दीवर रझाकारांशी लढा देऊन आर्य समाजाची उज्ज्वल परंपरा राखली. हैद्राबाद मधील स्वातंत्र्य संग्रामात आर्य समाजाने केलेल्या कामगिरीचे मूल्य सोन्याच्या अक्षरात लिहिले जाईल यात शंका नाही.*[३६] वऱ्हाडच्या बाजूने हदगांव तालुक्याच्या सीमेवर उमरीचे आर्य समाजाचे सर्व कार्यकर्ते निजामाचे पोलिस, रझाकार आणि निजामाची सैना यांच्याशी मुकाबला करण्यासाठी सज्ज होते. तर निजामाची निरंकुश सत्ता संपवण्यासाठी आर्य

आर्य समाजाचे क्रांतिकारी युवक पुढे आले होते. त्यामध्ये श्री. नारायणराव पवार, श्री. गण्डया व श्री. जगदीश या तिघांचा समावेश होता. त्यांनी प्राणाची बाजी लावून ४ डिसेंबर १९४७ मध्ये निजामाच्या मोटारीवर बॉंब फेकला. पण निजाम त्यातून वाचला. अखेर त्यांना कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. निजाम सरकारच्या वाढत्या अत्याचारा विरूध्द दाद मागण्यासाठी मराठवाडयातील आर्य समाजाचे अग्रणी सेनानी भाई बंसीलाल यांनी स्वतंत्र भारताचे पोलादी पुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची दिल्लीला भेट घेतली व त्यांना सर्व स्थितीचे स्वरूप स्पष्ट करून सांगितले. निजाम राज्याच्या सीमा प्रदेशातील छावण्यामध्ये श्री. रामचंद्रराव, मंत्री, आर्य समाज, लातूर, श्री. चंद्रशेखर वकील (लातूर) श्री. माणिकरावजी इ. नी व्यवस्थापनाची महत्वपूर्ण कामगिरी पार पाडली. श्री. महात्मा आनंद स्वामी महाराज (सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा) हैद्राबाद मुक्ती आंदोलनास मदत म्हणून सप्टेंबर १९४८ पर्यन्त दरमहा २००० रूपये पाठवत होते.[३७]

तत्कालीन ` जैसे थे ` करारानंतर भारत सरकारच्यावतीने श्री. कन्हैलाल मनोहरलाल मुंशी यांची एजंट म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यांना राज्यातील परिस्थितीची योग्य माहिती देण्याचे कार्य आर्य समाजीयांनी केले. त्यांनी वेळोवेळी भारत सरकारला परिस्थितीची कल्पना दिली. अखेर सरदार वल्लभभाई पटेलांनी वेळ येताच पोलिस कारवाईस प्रारंभ केला. त्याचे नेतृत्व मेजर जनरल चौधरी यांनी केले. १७ नोव्हेंबर १९४८ ला हैद्राबाद निजामी राजवटीतून मुक्त झाले. या मुक्ती लढयात मराठवाडयातील आर्य समाजाने महत्वपूर्ण भूमिका बजावली हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

इ.स. १८९१ ते १९४८ पर्यन्त जवळजवळ ५७ वर्षांच्या प्रदीर्घ काळात आर्य समाजाने केवळ संघर्ष व लढेच दिले असे नव्हे तर विधायक कार्यही केले. आर्य समाजाने धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्या इतकेच लोकशाही व्यवस्थेचाही आग्रह धरला. मराठवाडयातील अनेक लहान मोठया आर्य समाजी कार्यकर्त्यांनी मुक्ती लढयात फार मोठे योगदान दिले आहे.

म्हणून हैद्राबादच्या मुक्ती संग्रामाचे बरेचसे श्रेय आर्य समाजाच्या अनेक ज्ञात व अज्ञात हजारो कार्यकर्त्यांकडे जाते. सरदार वल्लभाई पटेल यांचा याबाबतचा उद्घोष उघड आहे. ते म्हणतात, " आर्य समाजाने यदि पहले से भूमिका तैयार न की होती तो तीन दिन में हैद्राबाद में पुलिस ॲक्शन सफल नही हो सकता था ।"[३८] यावरून हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये आर्य समाजाचे स्थान कसे श्रेष्ठ होते हे सिध्द होते. मात्र याबाबत प्रा. नरहर कुरूंदकर यांनी म्हटले आहे की, " आजचे बरेचसे नेतागण आर्य समाजाचे ऋण स्पष्ट शब्दात मान्य करीत नाहीत. हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये जनतेला जागृत करण्याचे कार्य आर्य समाजाने केले. अत्याचारी जुलमी राजवटीविरूध्द जो लढा, संघर्ष झाला त्यातले पहिले पाऊल आर्य समाजानेच उचलले. म्हणून हैद्राबाद मुक्ती संग्रामात आरंभापासून अंतापर्यन्त आर्य समाज ही मोठी शक्ती होती."[३९] आर्य समाजाने मुक्ती संग्रामात केलेल्या कार्याबाबत हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ यांनीही ऋण व्यक्त केले आहेत. दि. २० आक्टोबर १९४८ मध्ये लातूर येथील व्याख्यानात ते म्हणतात, " इस स्टेटमें केवल आर्य समाजनेही जागृती पैदा की है । जिसका प्रत्यक्ष रूप इस स्वतंत्रता प्राप्तीमें दिख रहा है । आर्य समाजीयोनेही स्टेट कॉंग्रेस के प्लॅटफॉर्म से कार्य किया और जो गौरव को बढाया । सारा श्रेय उनके नेताओ को है । मुझे पूर्ण आशा है कि भविष्य में भी हमेशा इस राजनैतिक संस्था(स्टेट कॉंग्रेस) को पूर्ववत सहयोग देते रहेंगे ।"[४०] तर आर्यांच्या सत्याग्रहाच्या संदर्भात महात्मा गांधी म्हणतात, " इतना अनुशासित और ज्वार की तरह उजडता हुआ सत्याग्रह मैने जीवन में पहली बार देखा था ।"[४१]

यावरून आर्य समाजाने हैद्राबाद राज्यात व पर्यायाने मराठवाडयात केलेल्या कार्यांची ओळख होते. आर्य समाजाच्या चळवळीमुळेच हैद्राबाद राज्यात सर्वांना राजकीय, सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्य मिळू शकले यात शंका नाही. शेवटी म्हणावे लागते की मराठवाडयातील आर्यजनांनी केलेला त्याग व बलिदान यामुळेच निजामाच्या कचाटयातून मराठवाडा मुक्त झाला.

## संदर्भ

1) काटे पी.व्ही. - मराठवाड्याच्या स्वातंत्र्य आंदोलनातील बुलेटिन्सचे स्वरूप, संशोधक, (त्रैमासिक) डिसेंबर, १९८६, पृ.५२.
2) कुरूंदकर नरहर - जागर, पृ.१०.
3) पोतदार वसंत ब. - हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, पृ. ६३.
4) कुरूंदकर नरहर - माझे प्रेरणास्थान पं. नरेंद्रजी, वैदिक गर्जना महासंमेलन विशेषांक, १९८२, पृ.२.
5) रणसुभे सूर्यनारायण, - हैद्राबाद मुक्ती संग्रामात आर्य समाजाचे योगदान, अमृतपुत्र, (त्रैमासिक) जुलै ते सप्टेंबर १९७६, पृ. २७.
6) पं. नरेंद्र - हैद्राबाद में आर्य समाज, विनायकराव अभिनंदन, ग्रंथामधील लेख, पृ. १२९.
7) वेदालंकार क्षितीश - निजाम की जेलमें, पृ. ११०.
8) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का वार्षिक विवरण (१९३१ ते १९४०), पृ. ३६.
9) पं. नरेंद्र - हैद्राबाद के आर्योंकी साधना और संघर्ष, पृ. १०८.
10) विद्यालंकार सत्यकेतू, वेदालंकार हरिदत्त - आर्य समाजका इतिहास भाग-२, पृ.५८७.
11) पं. नरेंद्र - हैद्राबाद के आर्योंकी साधना और संघर्ष, पृ. १०८, १०९.
12) विद्यालंकार सत्यकेतू, वेदालंकार हरिदत्त - उ.नि.पृ. ५९३.
13) भालेराव अनंत - पेटलेले दिवस (आठवणी), पृ.४६.
14) विद्यालंकार सत्यकेतू, वेदालंकार हरिदत्त - उ.नि.पृ. ५९४.
15) आचार्य वासुदेव - भागानगर सत्याग्रह, भारतीय इतिहास आणि संस्कृती (त्रैमासिक) जुलै, सप्टें. १९८६, पृ. ४४.
16) विद्यालंकार सत्यकेतू, वेदालंकार हरिदत्त - उ.नि.पृ. ५९९.
17) आर्य जीवन संमेलन विशेषांक, जुलै, १९७१, पृ. ७२.
18) किता, पृ. ६७.

१९) मालेराव अनंत - हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, पृ.१४७-१४८.

२०) देशपांडे द.ग. - हैद्राबाद व-हाड मुक्ती संग्राम, पृ. ९३.

२१) विद्यालंकार सत्यकेतू, वेदालंकार हरिदत्त - उ.नि.पृ. ६०७.

२२) पं. नरेंद्र - हैद्राबाद के आर्योंकी साधना और संघर्ष, पृ. १२४-२५.

२३) किता, पृ. १३२-३३.

२४) पं. नरेंद्र - हैद्राबाद मे आर्य समाज का संघर्ष, उ.नि.पृ. १३६.

२५) चौहाण संग्रामसिंह उर्फ स्वामी संतोषानंद, आर्य समाज मंदिर, औरंगाबाद यांची घेण्यात आलेली प्रत्यक्ष मुलाखत, दि. ६-८-१९८८.

२६) स्नेही नरदेव व तेरकर पां.व्य. - आर्य समाज समाजकारण व राजकारण, प्रा. भगवान काळे (सं.) मराठवाडा काल आणि आज ग्रंथातील लेख, पृ. २९४.

२७) शास्त्री आचार्य चंद्रशेखर - राष्ट्रनिर्माता सरदार पटेल, पृ. १६८.

२८) पं. नरेंद्र,- हैद्राबाद के आर्योंकी साधना और संघर्ष, उ.नि.पृ. १४५.

२९) विद्यालंकार जयदेव शर्मा - हैद्राबाद सत्याग्रह का रक्तरंजित इतिहास, पृ.८६.

३०) पोतदार वसंत ब. - उ.नि.पृ. ३७-३८.

३१) आर्यजीवन संमेलन विशेषांक, उ.नि.पृ. ६१.

३२) सूर्यवंशी उत्तमराव, टाकळगव्हाणकर - हैद्राबाद मुक्ती संग्राम, पृ. २९.

३३) पं. नरेंद्र - उ.नि.पृ. १४७.

३४) लाड जी.डी. - पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, पृ. १८९.

३५) पोतदार वसंत ब. - उ.नि.पृ. ३६.

३६) कुंटे भ.ग. (सं.) - स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोष, महाराष्ट्र राज्य, मराठवाडा विभाग, पृ. १७.

३७) देसाई डॉ. संजीव - हैद्राबाद संस्थान व मराठवाड्यातील आर्य समाज चळवळ, भारतीय इतिहास आणि संस्कृती (त्रैमासिक), जाने. मार्च १९८८, पृ. ४२.

३८) पं. नरेंद्र - उ.नि.पृ. १४८.

३९) कुंदकर नरहर - हैद्राबाद मुक्ती संग्राम आणि आर्य समाज, वैदिक गर्जना (पाक्षिक), जानेवारी, १९८४, पृ. १०.

४०) आर्य भानू, १ नोव्हेंबर, १९४८.

४१) रणसुभे सूर्यनारायण, उ.नि.पृ. ३३.